


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. २२ नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०१२ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

## बारामतीत अजित पवारांना मोठे यश

- ८ जागा बिनविरोध
- नगराध्यक्षपदासाठी 14 उमेदवार, तर नगरसेवकपदाच्या 33 जागांसाठी 145 जण रिंगणात



**बारामती:** (समर्थ गांवकरी)

बारामतीमध्ये उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शुक्रवारच्या (दि. 21) तारखेपर्यंत आठ नगरसेवकांच्या जागा बिनविरोध करण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला यश आले. अखेरच्या दिवशी नगराध्यक्षपदाच्या शर्यतीतून दोघांनी तर नगरसेवकपदाच्या शर्यतीतून 77 जणांनी माघार घेतली. 14 जण येथे नगराध्यक्षपदासाठी निवडणूक रिंगणात आहेत, तर नगरसेवकपदाच्या उर्वरित 33 जागांसाठी 145 एवढे विक्रमी उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी दाखल केलेले प्रभाग दोन 'अ' मधून अनुप्रिता तांबे या बिनविरोध असल्याचे अर्ज छाननी वेळीच स्पष्ट झाले होते. या शिवाय शुक्रवारी प्रभाग पाच 'अ' मधून किशोर मासाळ, प्रभाग सहा 'अ' मधून धनश्री बांदल, सहा 'ब' मधून अभिजित जाधव, प्रभाग आठ मधून श्वेता नाळे, प्रभाग 17 'ब' मधून शर्मिला ढवाण, प्रभाग 18 'ब' मधून अश्विनी सातव व प्रभाग 20 'ब' मधून आफिन बागवान हे उमेदवार बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले.

नगराध्यक्षपदासाठी बारामतीत आता 14 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. त्यात राष्ट्रवादी (अ. प.) पक्षाचे सचिन सातव, राष्ट्रवादी (श. प.) पक्षाचे बळवंत बेलदार, भाजपचे गोविंद देवकाते, शिवसेनेचे सुरेंद्र जेवरे, बहुजन समाज पक्षाचे काळूराम चौधरी, स्वराज्य शक्ती सेनेचे तुषार अल्हट, भारतीय प्रजा सुराज्य पक्षाचे विराज शिंदे यांच्यासह अन्य सात अपक्षांचा त्यात समावेश आहे.

आठ उमेदवार बिनविरोध झाल्याने ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर यांनी समाधान व्यक्त केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यकर्तृत्वावर विश्वास ठेवून प्रतिस्पर्ध्यांनी माघार घेतल्याने हे शक्य झाल्याचे ते म्हणाले.

दरम्यान बारामतीच्या रणांगणात युती, आघाडी होणार का? या प्रश्नाला शुक्रवारी पूर्णविराम मिळाला. कॉंग्रेससह, दोन्ही राष्ट्रवादी, भाजप, दोन्ही शिवसेना, बहुजन समाज पक्ष व अन्य पक्षांनी आपापली स्वतंत्र दावेदारी कायम ठेवली. त्यामुळे बारामतीच्या स्तरावर आजच्या घडीला तरी कोणत्याही पक्षाची युती, आघाडी झालेली नाही.

## शहरात रोज ९ टन कचरा, अनेक दवाखान्यांची नोंदच नाही



पुणे : शहर आणि उपनगरांतील अनेक छोटी-मोठी रुग्णालये, पॅथॉलॉजी लॅब तसेच क्लिनिक्सने बायोवेस्ट उचलण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे नोंद केली नसून, हा कचरा थेट शहरा बाहेर टाकला जात आहे. हा धोकादायक कचरा उघड्यावर रिचवून नागरिकांच्या जीवाशी खेळण्यात येत आहे. महापालिकेच्या कारवाईपासून वाचण्यासाठी थेट शहराबाहेर हा कचरा टाकला जात आहे.




## तहसील कार्यालयातून जप्त हायवा लंपास; अवैध उत्खनन सुरूच : महसूल वसुलीत तफावत

**छत्रपती संभाजीनगर:** (समर्थ गांवकरी)

पुढारी वृत्तसेवा महसूलपथकाने दोन ब्रास वाळूसह जप्त केलेला एक हायवा तहसील कार्यालयाच्या आवारातून चोरट्याने १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान वाळूसह चोरून नेल्याचा प्रकार समोर आला असून, प्रशासनाच्या ताब्यातील हायवा तहसील कार्यालयातूनच लंपास झाल्याने वाळूमाफियांचा धाक व प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



वाळूची चोरटी वाहतूक करणारा हा हायवा महसूल पथकाने सातारा येथून १२ नोव्हेंबर रोजी जप्त केला होता. तो हायवा (एमएच २० ईएल ६०५८) तहसील कार्यालयाच्या आवारात उभा करण्यात आला होता. मात्र चोरट्याने तो हायवा १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान वाळूसह चोरून नेला. याप्रकरणी ग्राम महसूल अधिकारी रघुनाथ काजे यांनी गुरुवारी (दि. २०) सिटी चौक पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली. या आधीही अशी वाहने लंपास झाल्याच्या घटना घडल्या असून, सुरक्षा यंत्रणा किती प्रभावी आहे यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान जिल्ह्यात गौण खनिजाच्या रॉयल्टीतून अपेक्षित महसूल मिळत नसल्याचे चिंताजनक चित्र समोर आले असून, अवैध उत्खनन आणि चोरटी वाहतूक रोखण्यात प्रशासन अपयशी ठरल्याची वस्तुस्थिती आली आहे.

राज्य महसुलाचा मुख्य स्त्रोत मानल्या जाणाऱ्या गौण खनिज महसुलीसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षात १५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट जिल्ह्यास देण्यात आले आहे. एप्रिलपासूनच वसुलीवर भर देणे अपेक्षित होते. मात्र ऑक्टोबर अखेरपर्यंत केवळ ३८ कोटी ७८ लाख रुपयांचीच वसुली झाल्याची माहिती जिल्हा खनिकर्म कार्यालयाच्या सूत्रांनी दिली. उद्दिष्टाच्या तुलनेत ही वसुली केवळ २५.८५ टक्के असून, शिल्लक साडेचार महिन्यांत उद्दिष्ट गाठणे आव्हानात्मक ठरणार आहे. तसेच अवैध वाळू उपसा रोखणे, महसूल वाढवणे आणि जप्त वाहनांची सुरक्षा सुनिश्चित करणे ही मोठी आव्हाने प्रशासनासमोर आहेत.

### केवळ १०० कारवाया

जिल्ह्यात अवैध उत्खनन आणि चोरट्या वाहतुकीविरुद्ध एप्रिल ते ऑक्टोबर या सात महिन्यांत केवळ १०० कारवाया करण्यात आल्या. पैठण तालुक्यात सर्वाधिक २५, तर वैजापूर १८, शहरात १५ आणि गंगापूरमध्ये १० कारवाया करण्यात आल्या. या कारवायांतून २ कोटी २२ लाखांचा दंड लावण्यात आला. त्यापैकी १ कोटी ३२ लाखांची वसुली झाली. तसेच १०५ वाहने आणि दोन यंत्रसामग्री जप्त करण्यात आली.

## नगराध्यक्षपदासाठी शिवसेना शिंदे गटाची भाजपशी थेट लढत

**जळगाव :** (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी अर्ज माघारीनंतर नगराध्यक्षपदासाठी तिरंगी, चौरंगी लढती होण्याची चिन्हे दिसून आली आहेत. मात्र, पाचोरा आणि मुक्ताईनगरात नगराध्यक्षपदासाठी प्रत्येकी दोनच उमेदवार शिल्लक राहिल्याने दोन्ही ठिकाणी शिवसेनेची (एकनाथ शिंदे) भाजपशी थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पाचोऱ्यात छाननीअंती नगराध्यक्षपदासाठी तीन उमेदवारी अर्ज पात्र ठरले होते. पैकी शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) उमेदवार जया पाटील यांनी शुक्रवारी त्यांचा अर्ज माघारी घेतल्याने आता शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) उमेदवार सुनिता किशोर पाटील आणि भाजप उमेदवार सुचेता दिलीप वाघ यांचे दोनच अर्ज शिल्लक राहिले आहेत. साहजिक आमदार किशोर पाटील आणि माजी आमदार दिलीप वाघ यांची प्रतिष्ठा तिथे आता पणाला लागली आहे. पाचोऱ्यात आमदार पाटील यांनी स्वबळाची भाषा करून थेट आव्हान दिल्यानंतर भाजपच्या वतीने माजी आमदार दिलीप वाघ यांच्या पत्नी सुचेता वाघ यांनी नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.



कोणत्याही परिस्थितीत पाचोरा नगर परिषदेवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी भाजपने कोणतीच कसर या निवडणुकीत ठेवलेली नाही. त्याची प्रचिती शनिवारी भाजप उमेदवार सुचेता वाघ यांनी नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आली. भाजपने शहरात मोठी फेरी काढून जोरदार शक्तिप्रदर्शन केल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर, आमदार किशोर पाटील यांच्यामागे शिंदे गटानेही मोठी ताकद लावली आहे. याशिवाय, जिल्ह्यातील नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी प्रभारींची नियुक्ती करताना शिंदे गटाने आमदार पाटील यांच्याकडे पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, जामनेर नगर परिषदांसह शेंदुर्णी नगर पंचायतीची सूत्रे दिली आहेत. आधीच आमदार पाटील यांच्यामुळे भाजपची डोकेदुखी वाढली होती. त्यात शिंदे गटातील त्यांचे राजकीय वजन वाढल्याने भाजपच्या गोटात आणखी खळबळ उडाली आहे. शिंदे गटाने आमदार पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी टाकून एक प्रकारे भाजप नेते मंत्री गिरीश महाजन आणि आमदार मंगेश चव्हाण यांना शह देण्याचा प्रयत्न केला आहे.

जिल्ह्यातील मुक्ताईनगरातही शिवसेना शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी भाजपला आव्हान देण्यासाठी त्यांच्या कन्या संजना पाटील यांना नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत उतरवले आहे. अर्थात, त्या ठिकाणी शिंदे गटाच्या उमेदवार संजना पाटील विरूद्ध भाजप उमेदवार भावना ललित महाजन यांच्यात थेट लढत आता होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, शरद पवार गटाचे नेते आमदार एकनाथ खडसे यांनी सोयीची भूमिका घेतल्यानंतर आमदार पाटील यांनी खडसे कुटुंबियांवर टीका करण्याची संधी साधली. एकनाथ खडसे हे सोयीनुसार भूमिका बदलून शरद पवार गट संपवायला निघाल्याचा आरोप देखील त्यांनी केला. त्यामुळे मुक्ताईनगरात भाजप आणि शिंदे गटात चांगलीच जुंपली आहे. भाजपसाठी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनीही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याचे बोलले जात आहे.

## ठाकरे बंधूंना अर्णव खैरेच्या मृत्यूच्या पापातून सुटता येणार नाही

**मुंबई:** (समर्थ गांवकरी)

ठाकरे बंधूंना अर्णव खैरे नामक तरुणाच्या मृत्यूच्या पापातून सुटता येणार नाही, असा घणाघात भाजपने मराठीच्या आग्रहासाठी रान पेटवणाऱ्या राज व उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना केला आहे. अर्णव खैरे नामक विद्यार्थ्याने कल्याण येथे गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्याने हिंदी, मराठी भाषिक वादामुळे लोकलमध्ये झालेल्या मारहाणीमुळे टोकाचे पाऊल उचलले होते. भाजपने आता या मुद्यावरून मराठीचा आग्रह धरणाऱ्या ठाकरे बंधूंना धारेवर धरले आहे. तसेच अर्णव खैरेच्या मृत्यूच्या पापातून ठाकरे बंधूंना सुटता येणार नाही, असा दावाही केला आहे. भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, मराठी माणसाने ठाकरे बंधूंना भरभरून प्रेम दिले. सत्ता दिली, सन्मान दिला... पण परत काय मिळाले? भकास मुंबई, आणि त्यांच्या स्वार्थी भावनिक राजकारणापायी निर्माण झालेला द्वेष.

## सिडकोची शिल्लक ४,५०८ घरे निघाली विक्रीला

**नवी मुंबई:** (समर्थ गांवकरी)

2018 पासून काढलेल्या गृह सोडतीतील शिल्लक राहिलेल्या सुमारे 4 हजार 508 घरे सिडकोने विक्रीसाठी काढली आहेत. ही सर्व घरे तळोजा, द्रोणागिरी, घणसोली, खारघर आणि कळंबोली या नोडमधील आहेत. सर्व घरे तयार असून सोडत न काढता 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर विकली जाणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 1,115आणि अल्प उत्पन्न गटासाठी 3,393 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. 2.50 लाख अनुदान उपलब्ध असून आज (22 नोव्हेंबर) दुपारी 4 वाजल्यापासून या घरांसाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीस सुरुवात होणार आहे. या सदनिका तयार (रेडी टू मूव्ह) असून अर्जदारांना त्यांच्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य असणार आहे. कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर पसंतीची सदनिका निवडण्याची संधी मिळणार असून सदनिकेच्या किमतीच्या संपूर्ण रकमेचा भरणा केल्यानंतर अर्जदारांना लगेच सदनिकेचा ताबा देण्यात येणार आहे.



- अर्जदारांना पसंतीची तयार सदनिका निवडण्याची संधी

**या योजनेसाठी सोडत, लॉटरी नसून अर्जदारांना आपल्या पसंतीची सदनिका निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. पुन्हा एकदा सर्वसामान्यांना नवी मुंबईमध्ये आपले घर घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. याकरिता अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा.**
**- विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# भाजपच्या ऑपरेशन लोट्समध्ये शिंदेंचे 35 आमदार फुटणार

## महाराष्ट्रात 'नाराजी' नाट्य कोसळणार : ठाकरे गटाच्या दाव्याने राज्यात खळबळ

**मुंबई :** (समर्थ गांवकरी)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे तब्बल 35 आमदार भाजपत जाणार असल्याचा मोठा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केला आहे. एकनाथ शिंदे यांनी जे पेरले तेच उगवले. भाजपला ते आता नकोसे झालेत. त्यामुळे महाराष्ट्रात त्यांना त्यांची जागा दाखवण्याचा लोट्स कार्यक्रम सुरू झाला आहे, असे ठाकरे गटाने म्हटले आहे. भाजपच्या कथित फोडाफोडीच्या राजकारणाला कंटाळलेले शिंदे सध्या नाराज असताना ठाकरे गटाने हा दावा केल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.



ठाकरे गटाने आपल्या मुखपत्रात म्हटले आहे की, महाराष्ट्रात सध्या जे 'नाराजी' महानाट्य सुरू आहे, ते गांभीर्याने घेण्याची गरज नाही. उपमुख्यमंत्री शिंदे दिल्लीतील त्यांचे पक्षप्रमुख अमित शहांना भेटले आणि त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांची तक्रार केली, "हे लोक आमचा पक्ष फोडत आहेत. चव्हाण पैशांचा वापर करून आमचे पदाधिकारी विकत घेत आहेत. हे आम्ही सहन करणार नाही." शिंदे यांच्या तक्रारीवर अमित शहा फसकन हसले. शिंदे यांनी विचारले, "साहब, आप क्यूं हस रहे हो."

यावर शहा म्हणाले, "कोण कोणाचा पक्ष फोडत आहे? मुळात तुमचा पक्ष हा आम्ही म्हणजे, भाजपने फोडाफोडी करून बनवला. तुम्ही फुटलात. आम्ही त्याला पक्ष म्हणून मान्यता दिली म्हणून तुम्ही 'पक्ष' वगैरे भाषा वापरत आहात. तुमचा जो काही पक्ष आहे तो भाजपची उपशाखा आहे.

शिंदेजी, आप क्रोनॉलॉजी समझ लीजिए. पैसे वाटून माणसे फोडण्यात तुमचा हातखंडा आहे. चव्हाण ते करत असतील तर वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. आप मुंबई जाओ और रवींद्र चव्हाण के साथ बैठकर चाय पिओ. उगाच फालतू तक्रारी घेऊन दिल्लीकडे येऊ नका." शहा-शिंदे यांच्यामधला हा संवाद मनोरंजक आहे. आता शिंदे म्हणतात, "त्यांची दिल्लीवारी यशस्वी झाली व आपला सन्मान राखण्याचा शब्द शहा यांनी दिला." ही शिंदे यांची बतावणी आहे, असे ठाकरे गटाने म्हटले आहे.

ठाकरे गट आपल्या मुखपत्रात पुढे म्हणाला की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपने शिंदे यांची अनेक माणसे फोडली. युतीच्या राजकारणात हे शोभत नाही. भारतीय जनता पक्षाने हे असे केले तर आमचा पक्ष टिकणार नाही अशी शिंदे व त्यांच्या लोकांची चिंता आहे. रवींद्र चव्हाण हे ठाणे जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे 'ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी' असे म्हणायला हवे. रवींद्र चव्हाण भाजपचे प्रदेशाध्यक्ष झाल्यापासून त्यांनी ठाणे जिल्ह्यातील शिंदे गटास खिंडार पाडले. शिंदे यांनी जी माणसे पाच-पंचवीस लाखांना विकत घेतली, त्यातील बरीच माणसे चव्हाण यांनी होलसेलात विकत घेतली. म्हणजे शिंदे यांचाच मार्ग चव्हाण यांनी अवलंबला.

### शिंदेंचे ३५ आमदार भाजपत जाणार

भाजपने एक 'पक्ष' निर्माण केला आणि त्याला संपवण्याची तयारी आता भाजपनेच सुरू केली आहे. शिंदे गटातले किमान 35 आमदार भाजपमध्ये प्रवेश करतील हे स्पष्ट झाले आहे. भाजपने 'ऑपरेशन लोटस' करून बाळासाहेब ठाकरे यांची मूळ शिवसेना फोडली. त्या फुटीचे सूत्रधार हेच शिंदे होते. आता दुसऱ्या 'ऑपरेशन लोटस' मध्ये शिंदे गटावरच घाव घालणे सुरू आहे. शिंदे यांचा पक्ष म्हणजे बुडबुडे आहेत. अमित शहा यांनी निवडणूक आयोग व सुप्रीम कोर्टाच्या संगनमताने शिंदे यांना शिवसेना हा पक्ष व धनुष्यबाण हे चिन्ह दिले. शिंदे यांनी शिवसेना फोडताना जी तलवार वापरली, त्याच तलवारीने आता त्यांचा घात होत आहे.

# ट्रम्पचं लाडकं 'लेकरू' होताना पाक कंगाल!



## संपादकीय

अमेरिकेनं आपल्या फायद्यासाठी पाकिस्तानला पंखाखाली घेतलं, चुचकारलं आणि पाकिस्तानचा वापर करून घेतला; पण, वेळ येताच पाकिस्तानला लाथाडलंही. जगभरात पाकिस्तानवर टीका होऊ लागल्यावर 'दहशतवादाचा प्रणेता' म्हणून त्याला झिडकारलंही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तर पाकिस्तानला 'धोकेबाज' देश, असंही म्हटलं. पण, याच अमेरिकेच्या विशेषतः ट्रम्प यांच्या मांडीवर बसण्यासाठी पाकिस्ताननं अलीकडच्या काळात जंग जंग पछाडलं. लहरी ट्रम्प यांची मर्जी सांभाळण्यासाठी पाकनं अक्षरशः जे जे म्हणून करता येईल ते ते केलं. 'भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध आपणच थांबवलं,' असं म्हणणाऱ्या ट्रम्प यांना त्याचं श्रेय देण्यास भारतानं नकार दिलेला असताना आणि ट्रम्प यांची नाराजी ओढवून घेतलेली असताना पाकिस्ताननं मात्र लगोलग ट्रम्प यांना हे श्रेय दिलं. नोबेल शांतता पुरस्कारासाठीही पाकिस्ताननं त्यांना नॉमिनेट केलं.

ट्रम्प यांचं 'लाडकं लेकरू' होण्यासाठी पाकिस्ताननं कोणतीच कसर सोडली नाही. त्यासाठी त्यांनी अक्षरशः कोट्यवधी रुपये खर्च केले. ट्रम्प आणि अमेरिकेवरचा त्यांचा हा खर्च अजूनही सुरूच आहे. ट्रम्प यांचं लांगूलचालन करण्यासाठी, त्यांनी आपल्याला चांगलं म्हणावं यासाठी पाकिस्तानची तिजोरी खाली होते आहे, ते अक्षरशः कंगाल होत आहेत; पण, काहीही करून पाकिस्तानला ट्रम्प यांच्या मांडीवर आणि पाळण्यात बसायचंच आहे, त्यांच्याकडून जोजवूनही घ्यायचं आहे. याचाच परिणाम म्हणून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अमेरिकेचे पाकिस्तानशी संबंध अचानक सुधारले आहेत. कपाकिस्तानचे आर्मी चिफ आसिम मुनीर सगळ्या जगात बदनाम आहेत; पण, त्याच मुनीर यांना ट्रम्प आता आपला 'फेवरिट फिल्ड मार्शल' म्हणतात! एप्रिलमध्ये ट्रम्प यांनी पाकिस्तानवर २९ टक्के टॅरिफ लावलं होतं. चार महिन्यांनंतर ते घटवून १९ टक्के केलं, तर भारतावरचं टॅरिफ वाढवून ५० टक्क्यांपर्यंत नेलं होतं.

हा बदल घडवण्यासाठी पाकिस्ताननं आपला खजिना अक्षरशः रिता सोडला आहे. आधीच



त्यांच्याकडं खडखडाट; पण, जगभरातून जे काही कर्ज त्यांनी उचललं आहे, त्यातला बराचसा पैसाही अमेरिकेच्या दारात जातोय. अमेरिकेची आपल्यावर मर्जी बसावी यासाठी पाकिस्ताननं अमेरिकेत 'पगारी लॉबिस्ट' नेमले आहेत. अमेरिकन वृत्तपत्र 'द न्यू यॉर्क टाइम्स' च्या मते, पाकिस्ताननं यंदाच एप्रिल आणि मे महिन्यात वॉशिंग्टनमधल्या अनेक लॉबिंग फर्म्सशी ५ मिलियन डॉलर्सचे (सुमारे ४२ कोटी रुपये) करार केलेत. याशिवाय ५०० मिलियन डॉलरचं मिनरल एक्स्ट्रॅक्शन डील केलं आणि अमेरिकन कृषी उत्पादनांसाठी आपला बाजारही खुला केला. ट्रम्प यांच्या जवळच्या लोकांना 'खूश' करण्यासाठीही त्यांनी आपली थैली मोकळी केली! ज्या फर्म्सशी पाकिस्ताननं करार केले, त्यातले काही लोक तर ट्रम्प यांचे अगदी 'खास' होते. उदाहरणार्थ त्यांचे माजी बिझनेस पार्टनर आणि बॉडीगार्ड कीथ शिलर! ८ आणि २४ एप्रिलला पाकिस्ताननं 'सीडेन लॉ LLP' या लॉबिंग फर्मशी करार केला, ज्यात 'व्हाइट हाउस स्तरावर बैठकींची व्यवस्था केली जाईल,' असं वचन होतं.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ४३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | | 7 | | 5 | 2 | |
| | 9 | 1 | 5 | 6 | | 8 | | |
| 8 | | 5 | 3 | 4 | | | | |
| | 1 | 7 | 4 | | | | | |
| 2 | 5 | | | | | | 8 | 1 |
| | | | | | 6 | 4 | 7 | |
| | | | | 2 | 1 | 3 | | 7 |
| | | 2 | | 9 | 3 | 1 | 6 | |
| | 3 | 6 | | 5 | | | 9 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ४२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 2 | 8 | 1 | 5 | 6 | 7 | 9 |
| 9 | 8 | 7 | 2 | 6 | 4 | 5 | 1 | 3 |
| 1 | 5 | 6 | 9 | 3 | 7 | 8 | 2 | 4 |
| 6 | 4 | 5 | 7 | 8 | 9 | 1 | 3 | 2 |
| 8 | 7 | 3 | 1 | 5 | 2 | 4 | 9 | 6 |
| 2 | 9 | 1 | 3 | 4 | 6 | 7 | 5 | 8 |
| 3 | 2 | 8 | 4 | 7 | 1 | 9 | 6 | 5 |
| 5 | 1 | 9 | 6 | 2 | 8 | 3 | 4 | 7 |
| 7 | 6 | 4 | 5 | 9 | 3 | 2 | 8 | 1 |

**पंचांग**
२२ नोव्हेंबर २०२५
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:द्वितीया १७:११:३७

नक्षत्र:ज्येष्ठा १६:४६:४३
योग:सुकर्मा ११:२९:१३
करण:कौलव १७:११:३७
करण:तैतिल
३०:१९:५८+
सूर्य:वृश्चिक

## उपदेशाचे डोस

### एडिसन

जगदविख्यात शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्या प्रयोगशाळेला १९१४ मध्ये आग लागली. या आगीत त्यांनी आयुष्यभर केलेल्या संशोधनाची कागदपत्रे, यंत्रसामग्री जळून खाक झाली. या आगीची वार्ता सम जताच त्यांचा मुलगा चार्ल्स एडिसन त्यांना भेटायला, मदत करायला धावत आला तेव्हा थॉमस एडिसन त्याला म्हणाले, '' अरे पाहत काय उभा राहिलास ? तुझ्या आईला चटकन बोलावून आण. असे दृश्य पुन्हा पाहायला मिळणार नाही.'' दुसऱ्या दिवशी आपल्या आशा - आकांक्षांची आणि स्वप्नांची झालेली ती राखरांगोळी पाहताना ते म्हणाले, '' सारी सामुग्री नष्ट होण्याचे खूप फायदे झाले. त्यामुळे माझ्या चुकाही जळून खाक झाल्या. आता मी नव्या जोमाने कामाला सुरुवात करु शकेन. एका अर्थी ही परमेश्वराची कृपाच म्हणायची !''

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३९ - थेम्स नदीच्या मुखाशी जर्मन विमानांनी जर्मनीवर किंवा पाण्यात पडल्यावर उशिराने स्फोट होणाऱ्या सुरूंगाची पॅराशूटच्या साहाय्याने पेरणी केली.
- १९७५ - स्पेनध्ये पुन्हा राजा गादीवर आला.
- २००३ - ऑस्ट्रेलियावर आश्चर्यकारक विजय मिळवून इंग्लंडने रग्बी विश्वचषक जिंकला.
- २००८ - ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज ब्रेट ली ने कसोटी सामन्यात ३०० बळी टिपले.

### राष्ट्रीय

- २००७ - भारतीय कसोटी संघाचा कर्णधार अनिल कुंबळेने पाकिस्तानविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी २ बळी घेत फिरोजशाह कोटला मैदानात आपले ५० बळी पुर्ण केले.
- २००८ - आशुतोष कौशिक 'बिग बॉस' सीजन २च्या बिग बॉस बनला.


### जन्म

- १८१९ - मेरी ॲन इव्हान्स 'जॉर्ज एलियट', लेखिका.
- १८८० - लक्ष्मण दफ्तरी, धर्मरहस्यकार.
- १८९० - चार्लस् द गॉल, फ्रान्सच्या माजी राष्ट्राध्यक्ष.
- १९०९ - दादासाहेब पोतनीस, पत्रकार.
- १९१९ - त्र्यं.वि. सरदेशमुख, मराठी साहित्यिक.
- १९६७ - बोरिस बेकर, टेनिसपटू.

### निधन

- १९४१ - कुर्ट काफ्का, जर्मन-अमेरिकन मानसशास्त्रज्ञ.
- १९४४ - सर आर्थर एडिंग्टन, प्रख्यात खगोलशास्त्रज्ञ.
- १९५९ - पार्श्वनाथ आळतेकर, नाट्यकर्मी.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ४३



**आडवे शब्द**

१. पत्रातून गायब झालेला मायना
९. मत्सर
११. ढग
१२. रुक्मिणीशी बलरामाचे नाते
१३. उत्तराधिकारी
१४. गायनातील एक ताल
१६. मासला
१८. नशीब लिहिणारी देवता
२०. डाव असा खेळू नये
२१. कठीण (प्रसंग)
२२. नाजूकपणे, हळुवार
२३. वैताग, त्रास
२५. समुद्रदेवता
२७. भीमाजवळचे शस्त्र
२८. फुलपुडीत येणारी बिनवासाची फुले
२९. लहान मुलांमधील अस्थमा
३१. उन्माद, गर्व
३२. एकशे पंचवीस
३३. त्रिकूट
३४. जीवमात्र
३५. चटकन
३७. धाक, दरारा
४०. गरज
४१. नारळाचे कवच
४३. दरोडा
४५. दिशाहीन पळणे
४९. राजवाडा
५०. बिरड्या
५१. चंद्र
५४. रुचीहीन
५५. वाळवी
५७. वाटाणा
५८. एक चर्मरोग
५९. मंत्रीमंडळ
६१. सीमेवरील चौकी
६२. विशेष, ६३. डावा
६४. सुरुवातीलाच नकारघंटा!
६६. चातकासह सगळ्यांनाच वाट पाहायला लावणारा ऋतू
६७. सम्राट
६९. कशा प्रकारचा
७१. पौराणिक अश्वाहन
७२. भारताचे राष्ट्रीय फूल
७४. घरोघर
७५. खोडकर, खट्याळ (हिंदी)
७७. कबूतर
७८. दरवाजा
८०. महान, मोठा
८१. नम्रता
८२. संथ गतीने

**उभे शब्द**

१. खटल्याचा आधार
२. अनेक विनोदी अभिनेत्यांना उजेडात आणणारा दूरदर्शनवरील कार्यक्रम
३. -- दमयंती
४. मदनाचे एक आयुध
५. आरास, मांडणी
६. बाईलबुद्ध्या
७. बाण, नदीचा काठ
८. अखेर, समाप्त
९. गुप्त हस्तक
१०. दुर्गंधी येऊ लागलेला
१३. खराब, हीन
१५. लपणे, -- मारणे
१७. खरे तर कर्णबधिर
१८. अखेरीस
१९. वेडावाकडा
२२. नखरा, लकब
२४. नखावरील ठिपका, घट्ट दही
२५. नाट्यगीतातील 'बोल'
२६. जुन्या काळी डोक्याला बांधले जाणारे वस्त्र
२७. नामघोष
२९. टणक खोडाचे काटेरी झाड
३०. खोड, सवय, चटक
३१. मर्कट
३२. युद्ध
३६. सिंह
३८. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
३९. चांदणी
४२. नमनीय
४४. दिवसभराचे एकूण कार्य
४५. सैल असलेले, ढगाळ
४६. भांडण, शत्रुत्व
४७. हिंदीत सुवर्ण किंवा झोपणे
४८. अफूचे बीज
५०. लाकूड छिलण्याचे हत्यार
५२. पाणी, ५३. दमणे
५६. वर्तमानपत्रातील कप्पा
६०. पदार्थ शिजतानाचा आवाज
६१. ठाण्याच्या रहिवासी
६२. संसद सदस्य
६३. वाहणारी हवा
६५. लत्ता, पायाने मारणे
६६. वाटी, पात्र
६७. मादक स्त्री
६८. पराभव
६९. सुवर्ण, हाटक
७०. आंब्याची पोळी
७३. स्त्रियांची छेड काढणारा
७६. चांगला मावा
७७. गावगप्पांची जागा
७८. देणारा
७९. गद्दारी

**शब्दकोडे क्र. ४२ चे उत्तर**

**आडवे उत्तर :** १.हवालदार ६.आतेभाऊ ९.जड १०.रस ११.मामलतदार १५.रन १६.हरकत १८.वग १९.जबडा २१.मनोहर २२.वाकडातिकडा २४.रज २५.मसलत २७.दलाई लामा ३६.नेम ३८.वदन ४०.रामलीला ४२.हर ४४.देहदान ४६.करुण ४७.विनवणी ४९.हर्ष ५०.सहल ५२.आर ५३.वानर ५५.कस ५७.तरतरीत ५९.दारोदार ६०.रामरक्षा ६२.पाल ६३.सदन ६४.मास ६५.तलवार ६७.आज ६८.बारीकसारीक ७१.नट ७२.पर ७३.रंग ७५.पद ७७.चाकरमानी ८०.भरजरी ८१.रचना ८२.लटलट ८३.रज

**उभे उत्तर :** १.हरहर महादेव २.वासर ३.दामात ४.रम ५.औंदा ७.तेरडा ८.भान ९.जवाहरलाल नेहरू १२.लवकर १३.तगडा १४.रजक १७.कमालकिमान २०.बडा २१.मजला २३.तिन्हीसांज २४.रदबदली २६.तसा २९.नद ३१.डावरा ३३.रोमहर्षक ३५.मला ३७.रमण ३९.दशानन ४१.महाल ४३.पाणी ४४.देह ४५.नस ४६.करतल ४७.विवाहसमारंभ ४८.वरदान ५१.हजरत ५२.आरपार ५४.गोदावरी ५६.सरासरी ५८.तनुज ६१.क्षालन ६४.मासा ६६.वाटचाल ६७.आरमार ६८.बाजरी ६९.कपार ७०.कप ७२.पर ७४.गर ७६.दल ७८.कट ७९.नीज

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोटिशीला केराची टोपली

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ते बिदर फूलवळ मार्गे जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० रस्त्यालगत असे अतिक्रमण काढून घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रत्येक अतिक्रमण धारकांना नोटीसा देऊन येत्या दहा दिवसांमध्ये अतिक्रमण काढून घेण्यास सांगितले. परंतु या नोटीसीचा अतिक्रमणधारकांवर कसल्याच प्रकारचा परिणाम दिसून येत नाही. अतिक्रमण काढून घेण्यासाठी दहा दिवसाचा कालावधी देण्यात आला होता हा कालावधी संपून जवळपास एक महिना होत आला तरीही अद्यापही



अतिक्रमण काढण्यात आले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाला फक्त नोटीस देण्या इतकाच वेळ मिळाला होता का ? हा ही प्रश्न येतील समस्त गावकऱ्यांना पडलेल्या दिसून येत आहे. विभागाने जशी नोटीस देण्याची तत्पर दाखवली तशीच तात्पर्तता अतिक्रमण काढण्यास का दाखवत नाही. गेल्या चार वर्षापासून फूलवळ येथील रोडचे काम अर्धवट अवस्थेमध्ये सोडून गुत्तेदार पळून गेले आहे. या अर्धवट राहिलेल्या कामामुळे येथे नेहमीच छोटे-मोठे अपघात होत असतात. येथे एखादी मोठी जीवितहानी झाल्या शिवाय सार्वजनिक बांधकाम विभागात जाग येणार नाही का ?

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून फुलवळ येथील रस्त्याच्या लगत अतिक्रमण करणाऱ्या नागरिकांना नोटीस काढून रस्त्याच्या मध्यरेषेपासून १५ मीटर अंतरावरील अतिक्रमण काढण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र येथे कोणत्याच अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण काढण्याची तात्परता दाखवली नाही. फुलवळ येथील राहिलेलाअर्धवट रस्ता करून अतिक्रमण काढून या रस्त्याचा वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटेल का? असा प्रश्न आता सुज्ञ नागरिकांच्याकडून उपस्थित केला जात आहे. तर या उलट काही नागरिकांनी याच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अतिक्रमने करून करोडो रुपयांची उलाढाल केली आहे. काहींनी त्यावर व्यावसायिक गाळे काढून मोठ्या प्रमाणावर आर्थिक माया जमवली आहे. ते तर अजूनही अतिक्रमने काढण्यास धजावत नसल्याचे दिसून येत आहे. जशी या अतिक्रमण केलेल्या जागा स्वतःच्या मालकीच्या आहेत अशा अविर्भावात काही स्थानिक नागरिक आल्याचे प्रथमदर्शी दिसते आहे. नांदेड बिदर राष्ट्रीय महामार्ग फूलवळ गावातून गेल्याने नागरिकांना उदगीर, लातूर,नांदेड येण्या-जाण्यासाठी हा मार्ग अत्यंत जवळचा व सोयीचा बनला आहे.



ठाणे : कदमपाडा ते माळशेज घाट महामार्ग रस्ताचे काम चालू असताना ठेकेदार यांनी दोन महिन्यांपूर्वी टोकावडे नाक्यावर खोदून ठेवले असल्याने टोकावडे बाजारपेठ ओस पडली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पासून टोकावडे नाक्यावरील बाजारपेठ ओस पडली असल्याने व्यापारी वर्ग संकटात सापडले असून नाक्यावर वर रस्ता खोदून ठेवून ठेकेदार यांनी आपल्या मशीन पोटगाव जंगलात नेऊन ठेवले आहे काही मशीन माळशेज घाटात आहेत मात्र नाक्यावर खड्डयांचे साम्राज्य पसरून ठेकेदार काय साध्य करत आहे हे त्यामुळे नाक्यावरील बाजारपेठ मधील रस्ता तोरीत करण्यात यावे नाही तर येत्या दोन दिवसांत रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल यांची नोंद ठेकेदार यांनी घ्यावी अशी मागणी व्यापारी वर्ग करत आहेत.

## थोडक्यात बातम्या...




### श्री अशोक भवारी यांना उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मान!

नाशिक (स. गांवकरी) : नाशिक जिल्हा परिषद (ग्रामपंचायत विभाग) यांच्यावतीने पं.स. सिन्नरचे गटविकास अधिकारी श्री अशोक भवारी यांना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले. गटप्रमुख म्हणून विविध योजना आणि अभियानांच्या प्रभावी अंमलबजावणीत त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचा गौरव म्हणून जिल्हा परिषद, नाशिक यांनी सन्मानपत्र प्रदान केले. ग्रामीण विकास, शासकीय योजनांची अंमलबजावणी, तसेच जनसहभाग वाढविण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकारांचे विशेष कौतुक या प्रसंगी करण्यात आले. या सन्मानाने पं.स. सिन्नरच्या कार्यक्षमतेत आणि विकास प्रक्रियेत नवचैतन्य निर्माण होणार असल्याचे मत ग्रामपंचायत विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. श्री अशोक भवारी यांच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील जबाबदाऱ्यांसाठीही त्यांनी अशीच प्रगती साधावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### डुंबरवाडी टोल नाका बंद करण्याचे दिलेले आश्वासन; आजी माजींना पडला विसर

जुन्नर (स. गांवकरी) : निवडणुका आल्या की आश्वासनांचा पाऊस पडतो. असेच एक आश्वासन जुन्नरच्या आजी-माजी आमदारांनी दिले होते. ते म्हणजे डुंबरवाडी येथील अनाधिकृत टोल नाका बंद करणार निवडणुका होऊन वर्षपूर्ती झाली तरी टोल नाका सुरूच आहे. मग हा टोल नाका अनाधिकृतच आहे. तर तालुक्याच्या लोकप्रतिनिधी तो टोल नाका बंद का केला होता. आणि तो पुन्हा सुरू झाला. जनतेच्या डोळ्यात धुळ फेकण्याचा प्रयत्न सुरू आहे की काय असे सामान्य नागरिकांच्या मनात पडला आहे. आणि माजी आमदारांनी या प्रश्नाकडे डोकावूनही पाहिले नाही. मग जुन्नरच्या जनतेने आता येणाऱ्या निवडणुकीत कोणावर विश्वास ठेवावा. जुन्नर तालुक्यातील टोल नाका व बिबट्याचे हल्ले हे मुख्य प्रश्न असतानाही त्या प्रश्नाकडे तालुक्यातील राजकीय पुढाऱ्यांचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. तालुक्यातील राजकारण टोल नाका व बिबट्याच्या भोवती फिरते पण हे दोन्ही प्रश्न प्रलंबीतच आहे. जुन्नर तालुक्यातील नागरिकांना राजकीय पुढाऱ्यांवरील विश्वासार्हता कमी होताना दिसत आहे. त्यामुळे जुन्नर तालुक्यातील सामान्य नागरिकांमधून एकच आवाज येतो की डुंबरवाडी टोलनाका बंद करा. आता किती जुन्नरकरांच्या सहनशीलतेचा अंत पाहणार आहात. जर जिल्हा परिषदे पंचायत समिती निवडणुकीच्या अगोदर टोल नाका बंद झाला नाही तर येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आवाज उठवला जाईल.

### नगराध्यक्ष पदासाठी भाजपा व राष्ट्रवादीत होणार लढत; काँग्रेस उमेदवाराची माघार



■ २० जागेसाठी ५८ उमेदवार निवडणूक रिंगणात

लोहा (स. गांवकरी) : लोहा नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि. २१ रोजी उमेदवारी मागे घेण्याची शेवटची तारीख होती. शेवटच्या दिवसा अखेर १९ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र मागे घेतल्याने एकूण २० जागेसाठी ५८ तर नगराध्यक्ष पदासाठी भाजपाचे गजानन सुर्यवंशी व राष्ट्रवादी चे शरद पवार हे दोन तगडे उमेदवार निवडणूक रिंगणात असल्यामुळे भाजप विरुद्ध राष्ट्रवादी अशी सरळ लढत होणार आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे व्यंकटेश संगेवार यांनी शेवटच्या दिवशी अध्यक्ष पदाच्या शर्यतीतून माघार घेतली आहे.

# अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचे अनुदान

■ शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग – डॉ. प्रवीण गेडाम

■ ॲग्री स्टॅक नोंदणीसाठी विशेष मोहीम राबविण्याच्या जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाला सूचना

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

अतिवृष्टी आणि पूर यामुळे दिनांक 1 जून 2025 ते सप्टेंबर 2025 या कालावधीत नुकसान झालेल्या नाशिक विभागातील शेतपीकांच्या नुकसानीसाठी राज्य शासनाने कोरडवाहू, बागायती आणि बहुवार्षिक पिकांसाठी तीन हेक्टरपर्यंतच्या मर्यादेत प्रति हेक्टरी जाहीर केलेले अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येत आहे. हे अनुदान विभागातील पाचही जिल्ह्यांना वितरित करण्यात आले असून आतापर्यंत विभागातील 16 लाख 59 हजार 519 शेतकऱ्यांच्या खात्यात 90360.79 लाख रुपये एवढे अनुदान वर्ग करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक आयडी तयार करण्यात आलेला नाही, अशा शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक आयडी तयार करण्याबाबत विशेष मोहिम स्वरुपात कार्यवाही करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले आहेत. यासंदर्भात येत्या सात दिवसात गावनिहाय ॲग्री स्टॅक मध्ये नोंदणी करावयाच्या शेतकऱ्यांची माहिती संकलित करुन त्यांची तात्काळ नोंदणी करण्याबाबतचे निर्देश विभागातील जिल्हाधिकारी तसेच कृषी विभागास देण्यात आले आहेत. नाशिक विभागात नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यात माहे 1 जून 2025 ते सप्टेंबर 2025 या कालावधीमध्ये अतिवृष्टी आणि पूर यामुळे नुकसान झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी शासनाने कोरडवाहू पिकांसाठी प्रति हेक्टरी रुपये 8500, बागायती पिकांसाठी प्रति हेक्टरी रु. 17000 आणि बहुवार्षिक पिकांसाठी प्रति हेक्टरी रुपये 22500 याप्रमाणे तीन हेक्टरच्या मर्यादेत हे अनुदान देण्यात येत आहे. त्यानुसार विभागातील पाचही जिल्ह्यांना खालीलप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली आहे. याशिवाय, खरीप 2025 या कालावधीत अतिवृषटी आणि पूर यामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामकरिता बियाणे व इतर अनुषंगिक बाबींकरिता हेक्टरी रक्कम रुपये 10 हजार ही विशेष मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या अनुषंगाने जिल्हानिहाय प्राप्त अनुदान आणि त्याच्या वितरणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

प्रलंबित रक्कम ही ई-केवायसी करुन तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये अनुदान मदतीचे वाटप तात्काळ जमा होण्यासाठी ज्या शेतकऱ्यांचे ॲग्री स्टॅक आयडी तयार झालेले आहे, त्यामधील पडताळणी करुन अशा शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये थेट पैसे जमा करण्याची कार्यवाही कऱण्यात येत आहे. ॲग्री स्टेंक आयडी नसलेल्या शेतकऱ्यांसाठी विशेष मोहीम राबविण्याच्या

या निर्देशानुसार पुढील एक आठवड्यात सर्व पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये मदतीची रक्कम जमा करण्याचे निर्देश डॉ. गेडाम यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. याशिवाय ज्या शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यात आलेले आहे अशा सर्व शेतकऱ्यांचे नाव, त्यांचा गट क्रमांक, व त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेली रक्कम याची गाव निहाय यादी तयार करुन अशी यादी प्रत्येक गावात प्रसिध्द करण्याबाबत व ही यादी जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबतचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. यामुळे प्रत्येक शेतकऱ्यास किती मदत अनुज्ञेय होती व किती रक्कम प्राप्त झाली याची पडताळणी करणे शक्य होणार आहे.

सूचना विभागीय आयुक्डॉ . गेडाम यांनी दिल्या आहेत. ज्या शेतकऱ्यांची ॲग्री स्टॅक मध्ये नोंदणी झालेली आहे, अशा शेतकऱ्यांना भविष्यात मदतीचे वाटप करतांना त्यांना ई- केवायसी करण्याची गरज भासणार नसल्याने सर्व शेतकऱ्यांनी ॲग्री स्टॅक मध्ये आपली नोंदणी करण्याबाबतचे आवाहनही त्यांनी केले आहे. ज्या शेतकऱ्यांना आज रोजी ॲग्री स्टॅक आयडी उपलब्ध नाही अशा शेतकऱ्यांनी ई - केवायसी केल्यास त्यांच्या खात्यामध्ये मदतीची रक्कम तात्काळ जमा होऊ शकते. या अनुषंगाने नाशिक विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अनुदान वाटप प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांची यादी गावनिहाय तलाठी यांच्यामार्फत चावडीवर चिकटवून मदतीस प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांचे ई- केवायसी पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

# नगराध्यक्षपदासाठी १ तर नगरसेवक पदासाठी १९ अर्ज मागे

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

काल अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्षपदाचा १ व नगरसेवकपदाचे १९ अर्ज मागे घेण्यात आले. आता नगराध्यक्षपदासाठी ३ तर नगरसेवक पदासाठी ६१ उमेदवार रिंगणात असून दि. २ डिसेंबर रोजी शहरातील साडे बावीस हजार मतदार त्यांच्या भवितव्याचा फैसला करणार आहेत. कंधार नगरपरिषद निवडणूकीचा प्रचार हळूहळू वेग घेत आहे. विविध पक्षाचे उमेदवार आपल्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह डोर टू डोर जाऊन मतदारांना आपली भूमिका स्पष्ट करीत आहे. अपेक्षेप्रमाणे महायुतीतील भाजप व राष्ट्रवादी हे पक्ष स्वबळावर निवडणूक रिंगणात असून 'मविआ 'वंचित बहुजन आघाडीला सोबत घेऊन मैदानात उतरली आहे. नगराध्यक्षपदासाठी मविआ वंचित बहुजन आघाडी कडून काँग्रेसचे शहाजी नळगे,महायुतीतील राष्ट्रवादी कडून हणमंत उर्फ (स्वप्निल) लुंगारे तर भाजप कडून गंगाप्रसाद यन्नावार हे उमेदवार रिंगणात असून कंधार न.पा. ही तिरंगी लढत होणार हे स्पष्ट झाले आहे. महायुतीतील शिवसेनेने अध्यक्षपदासाठी उमेदवार दिला नसला तरी नगरसेवकपदासाठी सेनेने चार उमेदवार रिंगणात ठेवले आहेत.'

# जनतेसाठी शब्द, विकासासाठी कृती - आ. शेखर निकम

**चिपळूण : (समर्थ गांवकरी)**

देव दिवाळीच्या शुभमुहूर्तावर असुर्डे गावातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सुकाई देवी मंदिर रस्ता विकासकामाचे भूमिपूजन आमदार शेखर निकम यांच्या शुभहस्ते अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावात संपन्न झाले.

गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांना गैरसोय निर्माण करणारा २ किमी लांबीचा दुर्गम रस्ता आता सुरक्षित, सोयीस्कर आणि दर्जेदार रूपात विकसित होणार असल्याची माहिती आमदार साहेबांनी यावेळी दिली. या कामासाठी त्यांनी विविध विकास निधीतून ६० लाख रुपयांचा महत्त्वपूर्ण निधी



उपलब्ध करून दिल्याचेही सांगितले. रस्त्याचे काम दर्जेदार आणि वेगाने पूर्ण करण्याबाबत त्यांनी ठाम आश्वासन दिले.

कार्यक्रमाची सुरुवात गावच्या आराध्य दैवत सुकाई माता यांना नारळ वाढवून करण्यात आली. हा मान मां. कमलाकर गावकर यांना मिळाला. त्यानंतर विधिवत भूमिपूजन सोहळा पार पडला.

या प्रसंगी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यात माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रोहनजी बने, जिल्हा परिषद गटाध्यक्ष संजयजी कदम, उपाध्यक्ष सुधीर राजे, पंचायत समिती गणाध्यक्ष नागेशजी साळवी, उपाध्यक्ष निलेश खापरे, सरपंच पंकज साळवी, उपसरपंच दिलीप जाधव, तसेच निर्मळवाडीतील अनंत निर्मळ, यशवंत निर्मळ, राजाराम निर्मळ, महादेव चोगले, प्रभाकर चोगले, गंगाराम चोगले, तानाजी चोगले, शिवाजी चोगले, समीर चोगले, अजित खापरे, शैलेश खापरे, मुंबई मंडळ अध्यक्ष संतोष चोगले, सचिव सूर्यकांत निर्मळ यांचा समावेश होता.

सोहळ्याला शेकडो ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून या विकासकामाचे स्वागत केले आणि आमदार साहेबांचे मनःपूर्वक आभार मानले.

सुकाई देवी मंदिर रस्ता विकासाच्या प्रारंभामुळे असुर्डे परिसराचा संपर्कमार्ग सुधारेल, शेतीकामांना गती मिळेल आणि गावाच्या सर्वांगीण प्रगतीला नवे बळ मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ अनुराधाताई नागवडेंना बँकेच्या चेअरमनपदाची संधी द्यावी

■ सामाजिक कार्यकर्ते मारुती पाचपुते यांची मागणी

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन स्व. शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बँकेच्या चेअरमनपदी सौ. अनुराधा राजेंद्र नागवडे यांची निवड करुन सहकार शताब्दी वर्षानिमीत्त महिलेला संधी देवून सन्मान करावा अशी मागणी काष्टी येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रगतशिल शेतकरी मारुती पाचपुते यांनी केली आहे. प्रसिध्दी पत्रकात श्री. पाचपुते



यांनी म्हटले आहे की, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि ही आशिया खंडातील अग्रगण्य सहकारी बँक असुन देशात सहकारी साखर कारखानदारीची सुरुवात अहमदनगर जिल्ह्यातून झालेली आहे. सहकारी चळवळीस १०० वर्षे पूर्ण होत असल्याने सध्या केंद्र शासनामार्फत सहकार शताब्दी वर्ष साजरे होत आहे. श्रीगोंदा तालुक्याचे भाग्यविधाते स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी सहकार क्षेत्रात दिलेले योगदान जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात सर्वश्रुत आहे. त्यांच्या सामाजिक, सहकार व राजकिय कार्याचा वारसा घेवून आज नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे व जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. अनुराधा नागवडे या उल्लेखनीय काम करीत आहेत. नागवडे कुटुंबाचे श्रीगोंद्याच्या जडणघडणीत मोठे योगदान असून श्रीगोंदा सारख्या दुष्काळी तालुक्यात नगर दक्षिण मध्ये सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे बापू यांनी 1965 साली खाजगी कारखाना सहकारी तत्त्वावर उभा करून श्रीगोंदा तालुका आज नागवडे कुटुंबांच्या योगदानातून प्रगतीपथावर दिसून येत आहे सहकाराच्या माध्यमातूनच सर्वांगीण विकास साधता येतो हा दृष्टिकोन सहकार महर्षी बापूंनी डोळ्यासमोर ठेवला आणि तेथून पुढेच खऱ्या अर्थाने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जीवनाला उज्वल भविष्य मिळाले. सहकारातून समृद्धीकडे हा मंत्र बापूंनी अंगीकारला आणि तो आज आपण सर्वजण साक्षात श्रीगोंदा तालुक्याच्या विकासाची उंची पाहत आहोत. त्यामुळे सहकाराशी नागवडे कुटुंबीयांचे अतूट नाते व अभ्यासू असणाऱ्या जिल्हा बँकेच्या संचालिका सौ अनुराधाताई नागवडे यांना चेअरमन पदावर संधी म्हणजेच सहकारातील निष्ठावंत कार्यकर्त्याला न्याय असे मत काष्टीचे सामाजिक कार्यकर्ते व प्रगतशील शेतकरी मारुती पाचपुते यांनी केली आहे.

या प्रसिद्ध पत्रकात श्री पाचपुते यांनी आणखी पुढे म्हटले आहे की, सौ. अनुराधा नागवडे या अभ्यासु, सक्षम कर्तव्यतत्पर महिला असुन, त्यांनी पंचायत समिती, जिल्हा परिषद व पंचायत राज समितीमध्ये उल्लेखनिय काम केले आहे. त्यांना सहकार शताब्दी वर्षात जिल्हा सहकारी बँकेच्या चेअरमनपदी काम करण्याची संधी मिळाल्यास त्या निश्चीतपणे बँकेच्या नावलौकीकास साजेशे काम करतील. त्यामुळे जिल्ह्यातील जेष्ठ नेत्यांनी सौ. अनुराधा नागवडे यांना जिल्हा सहकारी बँकेच्या चेअरमनपदी एकमताने निवड करुन संधी द्यावी, अशी आग्रही मागणी पाचपुते यांनी केली आहे.

# विश्वराज हॉस्पिटलचा 'सेवाभाव' मनाला भावला

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

काल मला अचानक हर्षल दादा व शाळेचे अध्यक्ष मनोज जी सुपेकर भेटायला आले. माझा फोन विश्वराज हॉस्पिटलमध्ये ICU त असल्यापासून बंदच होता. ते माझ्या मुलाचा नंबर कोणाकडून तरी मिळवून येथे आले होते हे बोलल्यानंतर समजले. खरं तर शाळेत जीव ओतून काम करणाऱ्या शिक्षकाबद्दल एवढी आस्था दिसणं दुर्मिळच ! पण मनोज जी सुपेकर हे व्यक्तिमत्व अनेक प्रसंगातून आलेल्या अनुभवातून घडलेलं अजब रसायन आहे. मला माणसांशी बोलून त्यांचं मन जाणून घ्यायची सवय आहे. जास्त गप्पातूनच' आतलं माणूसपण 'मी ओळखतोच. म्हणून तर काम केलेल्या प्रत्येक शाळेत माझे स्वच्छ मनाचे, खंबीर वृत्तीचे, प्रसंगी माझ्यासाठी व शाळेसाठी साथ देणारी माणसं मिळवू शकलो. माणसं प्रसंग आल्यावर ओळखायची असतात हे मी 'शिवतंत्रातून' शिकलो आहे. मला २ तारखेच्या रात्री व शाळेत आत्यावर ३ तारखेला अचानक हदयाचा त्रास झाला. तसाच इंगावले सरांना सांगून धडपडत स्वतः नलगे डॉक्टरांच्या दवाखान्यात गेलो. त्यांनी ECG केल्यावर सांगितले की तुम्ही लवकर मोठे हॉस्पिटल गाठा. कुणीतरी जोडीदार न्या. त्यावेळी मी फोन केला तो मनोजजींनाच. त्यांनी पुढे सारथ्य करून मी नगर पर्यंत मजल मारून धक्क्यातून वाचलो. डॉ. वारे यांच्याकडे ट्रिटमेंट सुरू झाली. तेथील ४ दिवसात ९०% ब्लॉकेजचे निदान झाले. ॲन्जिओप्लास्टीचा सल्ला मिळाला. मुंबईला गेल्यावर तर बायपास सर्जरी चा सल्ला मिळाला. १५ लाख खर्प सांगितला. ५ हजार सुद्धा FD नसणारा मी फाटका माणूस. फक्त पगारावर गुजराण करून मुलांमध्ये समाधान शोधणारा. पण मन खंबीर होते. हादरलो नाही. समोर पवार साहेबांचा आदर्श होता. तेथून तडक घरी आलो. २ दिवस विश्रांती घेतली. त्यावेळीही घरी मनोजजी भेटायला आले. माझा अस्वस्थ चेहरा पाहून सर तुम्ही खूप खचल्यासारखे दिसता खंबीर रहा. मुलांचे आशिर्वाद तुमच्या पाटीशी आहेत. असे सांगून धीर दिला. घरी गेले. परत आले ते प्रतिक्षा ताईंना घेऊनच. अनेकांना मदत मागितली होती. प्रसंग जीवावरचा असूनदेखील जिवलगांनीही पाठ फिरवली. काहींकडून मिळालेली मदत तुटपुंजी होती. ती नगरलाच संपली. तातडी कर्ज . घेऊन व बहिणींचा आधार घेऊन मी पुण्याला ॲडमिट होणार होतो. तेवढ्यात अध्यक्ष व ताई निघाल्या. निघताना एक लाख रुपये मदत माझ्याकडे दिली. ही लेकीची मदत ठेवा असे ताईंनी सांगितले. डोळे पाणावले. न मागता मन जाणणारी माणसं अशी असतात. घराण्याचं नाव सांगून मिशाला' तूप 'लावून गावात पाटीलकी करत खोटी प्रतिष्ठा दाखवत हिंडणारी माणसं मी पाहिली आहेत. पण सुपेकर - निंबाळकर घराण्याचं खरं घरंदाजपण दिसलं. शंभूराजे, पुरुषार्थ फक्त रणांगणातच गाजवायचा नसतो तो प्रसंगी पिडीत मावळ्यांना मदत करूनही दाखवावा लागतो' हे आबासाहेबांचे ( छत्रपती शिवाजी महाराज) वाक्य कोंढाणा प्रसंगी काढलेले उदगार आठवले. आज शस्त्रक्रियेतून बरा झाल्यावर फॉरमॅलिटी म्हणून अनेक जण भेटतील. पण जीवनमरणाच्या प्रसंगात उभे राहिलेले मनोजजी, भेटायला आलेल्या किशोरजींचा शिवम, उमाकांतजींचा राजवीर, मेजर नवनाथ शिंदेंचा लोकेश, खराडे सरांची ओवी दिदी यांच्या डोळ्यातील भाव सांगत होते, सर लवकर बरे व्हा ! खराडे ताईंनी दिलेले सुटवडा, सोनाली ताईची खीर, मांडे नानींनी आणलेला खाऊ व उसने घेतलेले शंभर रुपये तसेच दवाखान्यात मनोज जींच्या ताईंनी दाजींनी तीन दिवस आणलेला बदामाचा शिरा, दिपक पवारांचा बरे व्हा हा आशावाद व माझे विद्यार्थी पी आय बापू कायगुडे, येरवडाचे कस्टम वित्त अधिकारी अकिब शेख, सेवानिवृत्त असणारे पी .आय बाबासाहेब चव्हाण मामा व हे विद्यार्थी ३ दिवस सपत्निक येऊन भेटत राहिले. दै. लोकमतचे पत्रकार बाळासाहेब काकडे व परममित्र बापूसाहेब खामकर,४ भाचे पोलीस व ४ भाच्या डॉक्टर माझी काळजी घेत राहिले. विश्वराज ची डॉक्टर टीम हा परिवार पाहून' दक्ष 'राहिले. विश्वराज हॉस्पिटलचे डॉ. सुरजजी इंगोले, डॉ. विष्णुजी जाधव, आमचे पाहुणे डॉ. अविनाशजी सकट यांचे नेटाचे प्रयत्न तसेच सर्व स्टाफ डॉ. दिपक सर, सिस्टर संध्याताई, सिस्टर अंशूताई यांनी तसेच सर्वांनीच खूपच काळजी घेतली. विश्वराज हॉस्पीटल मधील 'सेवाभाव' मनाला भावला. सर्वांची तितकीच काळजी व सेवा देणारे, स्वच्छता तर अप्रतिमच ! खरंच विश्वराज ने मनावर राज्य केले. ठणठणीतच झालो. त्यानंतर बहिण व दाजींचा उरुळीतील कांचन परिवार, लोणी काळभोर चे सरपंच नंदूजी काळभोर यांची साथ मोलाची ठरली. हे सर्व या आधुनिक 'रामाला 'हनुमानाची संजीवनीच ठरले. तसेच साधा भोळा मित्र परिवार आयुष्यात विसरू शकणार नाही. सामाजिक कार्यकर्त्या नयनतारा शिंदे यांनी घरी भेट देऊन आस्थेने चौकशी करून शुभेच्छा दिल्या. दोन वर्षात या शाळेत खूप कष्ट उपसले. पैसा, श्रम, कष्ट, परिवार , सुट्टी यांचा विचार केला नाही म्हणून थकलेल्या शरीरानेही साथ सोडली होती. पण या प्रसंगात मिळालेल्या साथीने ऊर्जा मिळाली. शाळा सुधारली, नाहीतर बंद पडली असती असं काहींचं गोड बोलूनं ऐकून मनाला बरं वाटायचं ! पण प्रसंगी ते वरवरचेच असते हे प्रसंग आल्यावर समजते.आता मीही सामान्य शिक्षकांसारखं जगायचं ठरवलंय. प्रसंगानेच हे 'शहाणपण 'व मामा आता तरी कुटूंब पहा ही सर्व भाच्यांची' साद 'तसेच पाहुणे डॉ अविनाश सर यांनी आता आठ दिवस फक्त बेडरेस्टचा सल्ला याने आज मी भानावर आलो आहे. मनोज जी व मित्र परिवाराच्या आयुष्यभर ऋणात राहीन. हर्षल दादा सर्व विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी म्हणून आज भेटायला आला होता.. हर्षल दादा तू आयुष्यात खूप मोठा अधिकारी 'सिंघम' बनून नाव कमावणार तसेच विश्वराज सेवाभावामुळे विश्वावर राज्य करीन हे निश्चित ! . - **श्री. रामदास ठाकर, ( राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त, भारत सरकार, नवी दिल्ली तथा सदस्य, बालभारती पुणे )**

# दिलीप धर्माधिकारी यांना पक्ष न्याय देईल



**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव बरबडा येथे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बरबडा येथील स्वतंत्र सेनानी गोविदराव धर्माधिकारी सभागृहात दि . २० नोव्हेंबर रोजी सहविचार सभा संपन्न झालीं यावेळी राज्याचे माजी मंत्री तथा मा.खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व कंधार लोहा विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली बरबडा येथे स्व सेनानी गोविदराव धर्माधिकारी सभागृहात सहविचार सभा संपन्न झालीं आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची सहविचार सभा संपन्न झाली.

यावेळी बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या गावातील प्रतिष्ठित नागरिक व मतदारांना बंधु भगिनी उपस्थित होते सहविचार सभेचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी जिल्हा अध्यक्ष नांदेड व प्रदेश सचिटणीस दिलीप धर्माधिकारी यांनी केले होते.

यावेळी वसंत सुगावे-,मुक्तेश्वर धोंडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्षा सुनंदाताई जोगदंड, सौ.छायाताई दिलीप धर्माधिकारी, मनोहर भोसीकर, शिवाजी धर्माधिकारी, बालाजी शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक जिल्हाध्यक्ष, सुदर्शन धर्माधिकारी, प्रदेश संघटक डॉ. उत्तम सोनकांबळे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्यांक नांदेड शहराध्यक्ष अँड.जमीर माली पटेल,बाबुराव कदम,आशिष धर्माधिकारी,महिला नांदेड शहराध्यक्ष सुरेखा पाटील, सरचिट सुजाता पाम्पटवार, प्रभाकर पवार गोळेगावकर, बाळासाहेब देशमुख कावळगावकर,शिवाजी पाटील जाधव,प्रा.जीवन चव्हाण, दत्ता पाटील होटाळकर, रावसाहेब बेलकर,सय्यद भाई मेकानिक,विश्वनाथराव बडूरे, पत्रकार बाळासाहेब पांडे, , संजय नेरलेवाड, विद्यार्थी आघाडीचे शिवचंद्र डांगे,अंकुश हनुमंते सामाजिक न्याय विभाग, मंगेश आईनवाड, ज्ञानेश्वर सुरेवाड, वानखेडे गुरुजी,नागोराव टिप्पलवार गुरुजी,यांच्यासह बरबडा जिल्हा परिषद गटातील हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) : राज्य शासनाच्या युवा धोरण समितीवर आमदार संग्राम जगताप यांची निवड झाली असून शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन निर्णयानुसार पत्र जाहीर केले आहे त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सत्कार करताना माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा.माणिकराव विधाते, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश बनसोडे, माजी नगरसेवक सनी सूर्यवंशी, संतोष लांडे, संतोष ढाकणे, दीपक खेडकर, मयूर कुलथे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### टायगर ग्रुपतर्फे अलिबाग येथील वृद्धाश्रमात अन्नदान

- पनवेल अध्यक्ष शंकर जाधव यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमाने साजरा

**अलिबाग (स. गांवकरी) :** समाजसेवेचे व्रत घेतलेल्या टायगर ग्रुपच्या वतीने पनवेल अध्यक्ष शंकर जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी अलिबाग, परहुर येथील श्री समर्थ कृपा वृध्दधाम आश्रम येथे अन्नदान करण्यात आले. ग्रुपच्या वतीने अनेक मान्यवर या समाजोपयोगी उपक्रमासाठी उपस्थित होते. टायगर ग्रुपचे संस्थापक भारत अध्यक्ष जालिंदर जाधव आणि राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी जाधव यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.यावेळी वृद्धाश्रमातील वयोवृद्धांना अन्नदान करून त्यांचा आशीर्वाद घेण्यात आला. टायगर ग्रुपने सामाजिक बांधिलकी जपत हा वाढदिवस अत्यंत साधेपणाने आणि समाजोपयोगी पद्धतीने साजरा केला. या कार्यक्रमाला राष्ट्रीय उपाध्यक्ष भैय्यासाहेब बंडगर यांनी शुभेच्छा दिल्या. रायगड जिल्हा उपाध्यक्ष पै. अतुल बापू औटी, टायगर ग्रुपचे पदाधिकारी मा. पप्पू कौस्तुभ वाघोले, तसेच मा. रोहन पाटील, मा. आकाश घरात, आणि विहान पाटील यांचे यावेळी विशेष मार्गदर्शन लाभले. टायगर ग्रुप मित्र परिवारातील महाराष्ट्र राज्य सदस्य राजभाऊ चव्हाण, रोहीत मुळेकर, कारण मुळेकर, आणि संकेत नाईक यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. टायगर ग्रुप पनवेल अध्यक्ष मा. पै. शंकर भाई जाधव यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात केलेल्या या सेवाकार्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवार तर नगरसेवकपदासाठी ६९ उमेदवार रिंगणात

**कंधार (स. गांवकरी) :** दि २१ नोव्हेंबर 2025 रोजी, नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम तारीख होती, नगराध्यक्ष पदाचा १ , उमेदवार तर १ ते १० प्रभागातील उमेदवारांनी १९ उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली आहे, नगराध्यक्ष पदासाठी ३ उमेदवार निवडणुक रिंगणात तर नगरसेवक पदासाठी ६९ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी दिली. मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिद्ध केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार आगामी कारवाही प्रमाणे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी निवडणूक चिन्ह नेमून देण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक नियमबद्ध व सुरळीत रितीने पार पाडण्यासाठी सर्व उमेदवारांनी व नागरिकांनी सहकार्य करावे अशी विनंती निवडणूक निर्णय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी केली आहे.

### हिमायतनगर नगरपंचायत निवडणूक रणसंग्रामात तणाव शिगेला

- ठाकरे सेनेचे माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड vs राष्ट्रवादी (अजितदादा गट) मोहम्मद जावेद यांच्यात उमेदवारी मागे घेण्यावरून गोंधळ

**हिमायतनगर (स. गांवकरी) :** हिमायतनगर नगरपंचायत निवडणुकीला सुरुवात होताच राजकीय वातावरण तापले असून, आज दि २१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या प्रक्रिये दरम्यान ठाकरे सेनेचे माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे नेते मोहम्मद जावेद यांच्यात जोरदार तणाव निर्माण झाला. शहरातील १७ नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होत असताना, नामांकन परत घेण्याच्या दिवशी वार्ड क्रमांक ९ मध्ये मोठा गोंधळ झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. राष्ट्रवादीचे उमेदवार पांचमासे यांना अर्ज मागे घ्यायला लावला असा आरोप होत असल्याने परिस्थिती चिघळली. ठाकरे व राष्ट्रवादी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद, धक्काबुक्की व गदारोळ झाल्याचे चित्र तहसील कार्यालय परिसरात झाल्याचे पाहायला मिळाले. ही संपूर्ण घटना सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, नागरिकांमध्येही या घटनेची चर्चा जोरात रंगली आहे. उमेदवारी मागे घेण्यावरून सुरू झालेला वाद आता राजकीय मतभेद टोकाला पोहोचल्याचे स्पष्ट दिसत आहे. निवडणुकीचा प्रचार अजून वेग घेण्याआधीच संघर्षाच्या ठिणग्या पडल्याने आगामी दिवसांत हिमायतनगरचे राजकारण आणखी तापणार आहे. दरम्यान, आज काँग्रेसमधील नाराज नेते व कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात दाखल केलेल्या अपक्ष उमेदवारी अर्जावर पक्षाने मनधरणी करून नियंत्रण मिळवले असून, अनेकांनी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे हिमायतनगरच्या निवडणुकीत आता चौरंगी लढतीची शक्यता बळावली आहे.

# नियोजित टोल नाक्यावर अपघातात एकाचा बळी

## रुद्राणी कन्स्ट्रक्शनवर गुन्हा दाखल; तामसा येथील घटना

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोल नाक्यावर रुद्राणी कन्स्ट्रक्शनच्या हलगर्जीपणामुळे पर्यायी रस्ता न काढता रस्त्यावर टाकण्यात आलेले 'क्रॅश बॅरियर'ला टक्करून मोटरसायकलचा अपघात झाला. त्यात मोटारसायकल चालकाचा जागीच मृत्यू झाला असून रुद्राणी कन्स्ट्रक्शन व प्रोजेक्ट मॅनेजरवर मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याची घटना दि. २१ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी मध्यरात्री एक वाजता च्या सुमारास घडली.

अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ (आय) महामार्गावर तामसा नजीक टोलनाका उभारण्याचे काम एक वर्षापासून कासवगतीने सुरु आहे. टोलनाका उभारण्याचे काम सुरु असताना रुद्राणी कन्स्ट्रक्शनकडून कोणत्याही प्रकारचा पर्यायी रस्ता, दिशादर्शक चिन्ह, काम चालू असल्याचे दिशादर्शक बोर्ड, बॅरिकेट्स, बॅनर, रेडियम लावून वाहनचालकांना धोक्याचा इशारा देणाऱ्या कसल्याच निशाण्या, पाट्या लावलेल्या नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्यावरील वाहतुकीत येणारे अडथळे दिसत नसल्याने अपघात घडले आहेत. दि. २१ नोव्हेंबर रोजी रात्री अंदाजे एक वाजता च्या सुमारास घडली आहे. तामसा येथील 'आंध्रा' इडली सेंटरचे मालक सतीश सुरेश बारसे (वय ३६) राहणार बारसगाव ता. अर्धापूर हे मोटारसायकल क्रमांक एम. एच. - २० एफ. बी. ८४७७ वरून गुरुवारी रात्री नांदेडहून हॉटेलचे साहित्य खरेदी करून तामस्याकडे येत होते. राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोलनाक्याचे काम सुरू असल्याने रस्त्यावरच ठेवण्यात आलेले सिमेंटचे प्लेट 'क्रॅश बॅरियर' ठेवलेले त्यांना दिसले नसल्याने त्यावर मोटारसायकल धडकल्याने मोठा अपघात झाला. त्यातच चालक सतीश बारसे यांचा जागीच मृत्यू झाला.

मयताचा भाऊ माणिक सुरेश बारसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी छत्रपती संभाजीनगर व कंपनीचे सिनिअर प्रोजेक्ट मॅनेजर धोंडीराम जांभळे यांचे विरुध्द मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार बालाजी नरोटे करीत आहेत.

# नगराध्यक्ष पदासाठी ९ तर नगरसेवक पदासाठी ७३ अर्ज वैध

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

येथील नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ मध्ये नगराध्यक्षपदासह नगरसेवक पदाच्या १० प्रभागामधुन २० जागांसाठी काँग्रेस, आघाडी, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व अन्य नगराध्यक्ष पदासाठी ९ तर नगरसेवक पदाच्या २० जागांसाठी ७३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे राहणार असल्याचे चित्र दि.२१ रोजी स्पष्ठ झाले आहे. दि.२१ रोजी उमेदवारी अर्ज माघार घेण्याची प्रक्रीया पार पडली यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी भरलेल्या ११ पैकी २ माघार घेतल्यामुळे अध्यपदाच्या रेसमध्ये ९ उमेदवार उभे आहेत नगर सेवक पदासाठी भरलेल्या ८३ नामांकनापैकी १० नामांकना माघार घेण्यात आले असुन ७३ उमेदवार नगर सेवक पदाच्या निवडणुकीसाठी रिंगणात उभे राहणार असुन यामध्ये नगराध्यक्षपदासाठी इंद्रजीत यादवराव तुडमे(राष्ट्रवादी काँग्रेस) संतोष लक्ष्मीकांत कुलकर्णी (शहर विकास आघाडी) विजय व्यंकटेश कुंचनवार(शिवसेना)शेख सलीम शे.अहमद (राष्ट्रवादी काँग्रेस - शरद पवार )भिमराव संभाजी लाखे (बहुजन समाज पार्टी)भीमराव मरिबा जेठे, इरेश मोहनराव माचलोड,नागोराव चांदु कुडके हे निवडणूकीच्या रिंगणात आहेत.तर नगराध्यक्ष पदासाठी नामांकन दाखल केलेले अब्दुल मतीन अब्दुल बशीर, संदिप रघुनाथ कटारे यांनी माघार घेतली.

# निमगाव प्रा. आरोग्य केंद्रास सहा महिन्यापासून रुग्णवाहिका मिळेना

- प्रशासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया, शिष्टमंडळ घेणार माजी मुख्यमंत्री, आमदारांची भेट



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील निमगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे गेल्या सहा महिन्यापासून रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे येथे गरोदर महिलांसह विविध रुग्णांना मोठी हेळसांड होत असून इतर रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेक वेळा गरोदर मातांसह रुग्णांची मोठी हेळसांड होत आहे याकडे प्रशासनाने त्वरित लक्ष द्यावे अशा प्रतिक्रिया येथील ग्रामस्थांमधून निघत आहेत. निमगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहिक गेल्या पाच ते सहा महिन्यापासून दुरुस्त नसल्याने रुग्ण व नातेवाईकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे येथील रुग्णालयाची गती मंदावली असून "कोणी रूग्णवाहीका देता का रूग्णवाहीका" अशी आर्त हाक देण्याची वेळ येथील रुग्णांवर आली आहे. गत सहा महिन्यापासून रुग्णवाहिकेची दुरुस्ती होत असल्याची माहिती परिसरातील नागरिकांना मिळत आहे पण रुग्णवाहिका काही सेवेत उपलब्ध होईना.

तालुक्यात निमगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत परिसरातील निमगाव, चोरंबा, खैरगाव, रोडगी, चाभरा, चाभरा तांडा,सोनाळा, देशमुख वाडी, सायाळ वाडी आदी गावातील रुग्णांना रुग्णसेवा उपलब्ध होते. या परिसरात पाणी, शिक्षण, आरोग्य, रस्ते, धरणे असा चौफेर विकास केला आहे. तर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकामही पूर्णत्वास आले आहे. या परिसरात शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, आदिवासी बांधवांच्या आरोग्याची मोठी सोय झाली आहे. मात्र वरिष्ठ कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे निमगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गत सहा महिन्यापासून रुग्णवाहिका नसल्याने रुग्णांची मोठी हेळसांड होत आहे. रुग्णवाहिका तत्काळ उपलब्ध करून देण्याची मागणी रहिवाशांसह रुग्णांच्या नातेवाईकांनी केली आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण यांची भेट घेऊन रुग्णवाहिका तात्काळ उपलब्ध करावी अशी मागणी परिसरातील शिष्टमंडळ करणार आहे. रुग्णवाहिका अभावी गरोदर मातांसह अनेक रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे.

# अनेक पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



आज गोरठेकर संपर्क कार्यालय येथे ज्येष्ठ नेते अँड. भाऊसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या उपस्थितीत उमरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष देशमुख गोरठेकर व संचालक कैलास देशमुख गोरठेकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे मराठवाडा सचिव किशोर कवडीकर, जिल्हा कार्याध्यक्ष संजय वाघमारे बोथीकर, जिल्हा प्रवक्ते प्रा.पि.एन.धसाडे सर,मा.लो.प.

जिल्हाध्यक्ष के.वाय.देवकांबळे, ग्रा.पं.सदस्य बोथी गोपाळराव खांडरे, ग्रा.पं.सदस्य बोथी पोचिराम दुबळेकर, युवा ता.उपाध्यक्ष उमरी प्रफुल्ल वाघमारे, तालुका सचिव उमरी राम बोईवार,माजी ग्रा.पं.सदस्य तळेगाव बाबुराव कवडीकर, गोविंद दत्ता कवडीकर, मारोती जकोजी कवडीकर ,अजय गोविंद कवडीकर, भाऊसाहेब भालेराव (दुर्गानगर), साहेबराव गायकवाड, परमेश्वर नागोराव कवडीकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी राजीव पाटील ढगे, आनंदराव यल्लमगोडे व जयविजय देशमुख,बालाजी देवके,बालाजी बट्टेवाड उपस्थित होते.

पक्षात नव्याने येणाऱ्या सर्व मान्यवरांचे स्वागत करून गोरठेकर परिवारांनी विकासाच्या वाटचालीत मजबूत पाऊल टाकल्याचे सांगितले.

# नगर परिषद निवडणुकी करिता अंतिम उमेदवार निश्चित

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

नगर परिषद निवडणुकीच्या नामांकन प्रक्रियेत आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार डॉ शारदा चौंडेकर, मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्यासह निवडणुकी करिता नियुक्त अधिकाऱ्यांनी सविस्तर प्रक्रिया शांततेत संपन्न केली.

यावेळी पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक पोलिस बंदोबस्त लावण्यात आला ज्यामध्ये पोलिस उप निरीक्षक सागर झाडे यांच्या सह पोलिस अधिकारी व कर्मचारी तैनात होते.

तरी थेट नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकी करिता ८ उमेदवार उभे राहिले असून १ ते १० प्रभागातील अंतिम उमेदवार खालील प्रमाणे उभे आहेत यांना दिनांक २६ रोजी चिन्ह वाटप केले जाणार असून त्याच दिवशी अधिकृतरित्या प्रचाराची सुरूवात होणार आहे.

# संलग्नित महाविद्यालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ प्रशासन कटिबद्ध

## कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, कौशल्यविकास आणि शैक्षणिक उन्नती साधण्यासाठी विद्यापीठ नेहमीच सकारात्मक आणि आग्रहाची भूमिका घेत आहे. विद्यापीठाशी संबंधित विविध प्रशासकीय व शैक्षणिक अडचणी दूर करून महाविद्यालये आणि विद्यापीठ या दोघांचाही सर्वांगीण विकास साधण्यास विद्यापीठ प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

विद्यापीठातर्फे संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाचालक व प्राचार्य यांच्यासमवेत सहविचार सभांचे आयोजन दि.१९ व २० नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या आधीसभा सभागृहात करण्यात आले होते. अध्यक्षीय स्थानावरून संबोधित करताना डॉ. चासकर यांनी विद्यापीठाच्या विकासदृष्टीची रूपरेषा मांडली.

या बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. माधव गव्हाणे, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. डी. एम. खंदारे, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, आयक्यूएसी संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांसह विद्यापीठातील अनेक अधिकारी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. चासकर म्हणाले, "संलग्नित महाविद्यालयांना अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्या अडचणींचे निराकरण आणि भविष्यातील शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले आहे."

ते पुढे म्हणाले, अॅकडेमीक अँड अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट (AAA) संदर्भात विद्यापीठाची आग्रही भूमिका असून सर्व महाविद्यालयांनी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक आहे, ज्यामुळे शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्तेत वाढ होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० टप्प्या टप्प्याने राबविण्यास सुरुवात झाली आहे आणि सर्वच महाविद्यालयांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. युआयएमएस सॉफ्टवेअरमुळे विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या कामकाजाला अधिक वेग प्राप्त झाला आहे.

परीक्षा पद्धतीबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, उत्तरपुस्तिकांचे स्कॅनिंगद्वारे मूल्यमापन सुरू केल्याने प्राध्यापकांचा वेळ मोठ्या प्रमाणात वाचत असून निकाल वेळेत लावण्यास मदत होत आहे. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करून प्रकरणे जलदगतीने निकाली काढली जात आहेत.

स्टार्टअप संस्कृती बळकट करण्यासाठी विद्यापीठाच्या आग्रही भूमिकेचा पुनरुच्चार करताना त्यांनी प्रत्येक महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना प्रेरित करून नवोन्मेषी स्टार्टअप प्रकल्प तयार करण्याचे आवाहन केले.

दोन दिवस चाललेल्या सहविचार सभेला सुमारे ७० संस्थाचालक आणि १५० प्राचार्य यांनी उपस्थिती लावली. खेळीमेळीच्या वातावरणात विद्यापीठ व महाविद्यालयांच्या विकासासाठी विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा होऊन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत अनिल बोरनारे आंदोलनाचा तयारीत

## शिक्षणाधिकारी शिक्षण उपसंचालकांकडे मार्गदर्शन मागून शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित ठेवतात - अनिल बोरनारे यांचा आरोप

**ठाणे:कल्याण :** (समर्थ गांवकरी)

शिक्षकांच्या सेवाशर्तींची अनेक प्रकरणं सोडवण्यासाठी शिक्षण अधिकारी सक्षम असताना देखील ही प्रकरण शिक्षण उपसंचालकांकडे पाठवून विलंब करत असल्याचा आरोप अनिल बोरनारे यांनी केला असून तातडीने ही सर्व प्रकरण निकाली न काढल्यास ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा मुंबई मुख्याध्यापक संघटना उत्तर विभाग अध्यक्ष व भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य अनिल बोरनारे यांनी शिक्षण उपसंचालकांना केला आहे



याबाबत अनिल बोरनारे यांनी मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांना निवेदन देऊन ही प्रकरण सोडवण्याची मागणी केली आहे  मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे मुंबईतील बृहन्मुंबई शिक्षण निरीक्षक उत्तर दक्षिण व पश्चिम विभाग हे जिल्हे तर ठाणे रायगड व पालघर जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालय तसेच ठाणे जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका नगरपालिका व जिल्हा परिषद अंतर्गत शाळा यांचा समावेश होतो या कार्यालयांच्या अंतर्गत येणाऱ्या शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांचे प्रश्न शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे येत असतात यातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी शिक्षण अधिकारी सक्षम असून सुद्धा शिक्षण उपसंचालकांकडे मार्गदर्शन मागून त्यांच्याकडे प्रस्ताव पाठवला जातो व शिक्षकांची प्रश्न प्रलंबित राहतात याबाबत शिक्षण उपसंचालकांनी त्यांच्या कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना आदेश देऊन सर्व प्रश्न तातडीने सोडवण्याचे आदेश निर्गमित करावे अन्यथा याबाबत मुंबई मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष व भाजपाचे प्रदेश कार्यकारणी निमंत्रित सदस्य अनिल बोरनारे यांनी आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.



ठाणे : दिवा शहरासह रहिवासी इमारतींमध्ये कचराकोंडीमुळे नागरिक नाल्यांमध्ये कचरा टाकू लागल्याने नाले देखील तुडुंब भरु लागले असून येणाऱ्या काही दिवसात दिवेकरांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. नाल्यात सांडपाण्यापेक्षा कचरा मोठ्या प्रमाणात दिसून येत असून ठाणे महापालिकेचे पूर्णतः  दुर्लक्ष दिसून येत आहे. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...

### डॉ.धनंजय गडगे यांना पी.एच.डी पदवी प्रदान



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ओतूर येथील पुणे जिल्हा शिक्षणमंडळाच्या  आण्णासाहेब वाघिरे महाविद्यालायतील रसायनशास्त्र विभागातील प्रा. धनंजय ज्ञानेश्वर गडगे यांना सावित्री बाई फुले पुणे विद्यापीठाची पी.एच.डी.पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली त्यांच्या प्रबंधनाचा विषय "ऑर्गेनो-कॅटॅलाइझ्ड वन-पॉट मल्टिकॉम्पोनेंट सिंथेसि स ऑफ नायट्रोजन,ऑक्सिजन हेटेरोसायक्लिक स्कॅफोल्ड्स"हा असून त्यांना गाईड म्हणून प्रा.डॉ.पी. एस.कुलकर्णी यांनी मार्गदर्शन  केले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे मानद सचिव ॲड.संदीप कदम, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, खजिनदार ॲड.मोहनराव देशमुख,उपसचिव एल.एम.पवार, सहसचिव( प्रशासन) ए.एम. जाधव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे,उपप्राचार्य डॉ रमेश शिरसाट, डॉ.कल्याण सोनवणे,सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीवृंद यांच्या वतीने अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

### मोकसबाग कांदळी येथे "तुकोबांची जीवनकथा ज्ञानयज्ञ सोहळा" कार्यक्रम

शिवनेरी (स. गांवकरी) : "तुकोबांची जीवन कथा ज्ञान यज्ञ सोहळा" मोकसबाग कांदळी शिवचिदंबर महास्वामी देवस्थान येथे शुक्रवार दिनांक २१ ते मंगळवार दिनांक २५ ह भ प श्रीकांत दुराफे सायंकाळी ६ . वा . कथा आयोजन केले आहे. हळदी समारंभ मंगळवार दि . २५ दुपारी ३ वा.तसेच दुपारी ४ . ३० वा सीमंती पूजन तसेच दररोज रात्री ठीक ९ वा . महाप्रसादाचे आयोजन केले आहे. चंपाषष्ठी निमित्त कार्यक्रम बुधवार दि. २६ , सकाळी ८ वा. मांडव डहाळे, गोंधळ , रुखवत व मिरवणूक , दु.१२. १  मि. कल्याणोत्सव शुभविवाह सोहळा कार्यक्रम आहे . या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी सर्व नागरिकांनी उपस्थित रहा असे आव्हान चिदंबरम सेवा समिती यांनी केले आहे.

### जिल्हा परिषद शाळांच्या शासकीय वेळेत बदल करा : पांडुरंग पवार यांची मागणी



आळेफाटा (स. गांवकरी) : वारंवार होणारे बिबट्याचे हल्ले यामुळे नागरिक भयभीत झाले असून,जिल्हा परिषद शाळांच्या वेळेत बदल करण्याचे आवाहन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्याकडे माजी जिल्हा परिषद सदस्य पांडुरंग पवार यांनी निवेदनाद्वारे केले आहे. पवार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड आदि तालुक्यांमध्ये बिबट्याच्या वावरामुळे व वारंवार होणा-या हल्ल्यामुळे सर्वत्र घबराट व भितीचे वातावरण आहे. विशेष करुन शालेय विदयार्थ्यांना याचा सामना करावा लागतो आहे. सुरक्षितता म्हणुन इ.१ ली ते इ.१२ वी पर्यंतच्या सर्व शाळांची वेळ बदलुन सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत करावी जेणे करुन मुलांना आपल्या भावंडा बरोबर शाळेत जाता व पुन्हा सुरक्षित घरी येता येईल. याबाबत आपण योग्य तो निर्णय घ्यावा.

### नगराध्यक्षा पदासाठी ९ तर १०२ नगरसेवक रिंगणात

जामखेड तालुका (स. गांवकरी) : नगर पालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी अधिकृत सहा पक्षाचे उमेदवार उभे आहेत.. व तिन अपक्ष उमेदवार उभे आहेत. अधिकृत सहा पक्षाचे उमेदवार असलेतरी खरी लढत. भाजप.. शिवसेना. शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार... या मधेच अटी तटीची होईल असे आजचे राजकीय चित्र आहे.. जसी निवडणूक जवळ येईल तसे तसे चित्र बदलु शकते. जामखेड नगरपरिषद निवडणूकीत अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ९ नगराध्यक्षांपैकी उमेदवारांनी माघार घेतली. तर १२० नगरसेवकांपैकी १८ उमेदवारांनी माघार घेतली आहे. आता नगराध्यक्षपदाचे ९ उमेदवार रिंगणात असल्याने मोठी चुरस पहायला मिळणार आहे.

# हेल्मेट वापरासाठी समाजात व्यापक जनजागृती आवश्यक - ठाणे जिल्हाधिकारी



**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

रस्ते अपघातांत मृत्यू पावणाऱ्यांमध्ये तरुणांचा वाढता सहभाग चिंताजनक असून त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी हेल्मेट वापराविषयी समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. ठाणे जिल्हाधिकारी आवारातील जिल्हा नियोजन भवनातील सभागृहात चित्रमेध व्हिजन आणि जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय, पोलीस विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हेल्मेट वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला 'हेल्मेट मॅन ऑफ इंडिया' म्हणून परिचित असलेले श्री. राघवेंद्र कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे, भिवंडी महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर, लेफ्टनंट कर्नल विवेक तिवारी, आयटी तज्ञ पवन द्विवेदी, लेफ्टनंट कर्नल मोहित गौर (निवृत्त), जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, चित्रमेध व्हिजनचे आयोजक बबन लाटे व विशाल लाटे यांच्यासह मोठ्या संख्येने ठाणे पोलीस स्कूलचे प्राथमिक विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. ठाणे जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले "ठाण्यात लहान मुलांना हेल्मेट वाटपाचा असा उपक्रम प्रथमच राबविला जात आहे, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. सर्वसाधारणपणे १८ वर्षांनंतर वाहन चालविण्यास पात्र झाल्यावर तरुणांमध्ये हेल्मेटचा वापर वाढतो. परंतु राघवेंद्र कुमार यांनी मांडलेली 'लहानपणापासून हेल्मेटची सवय' ही संकल्पना मुलांमध्ये सुरक्षिततेची जाण निर्माण करणारी आहे. आज मुलांमध्ये जागरूकता निर्माण झाली, तर भविष्यात ते स्वतः हेल्मेटचा योग्य वापर करतील आणि समाजातही त्याचा प्रसार करतील." रस्ते अपघातातील मृत्यूचे वाढते प्रमाण गंभीर असून हेल्मेटचाच वापर हे त्यावरील सर्वात सोपे व प्रभावी उपाय आहे, असेही त्यांनी नमूद केले. तसेच राघवेंद्र कुमार यांच्या २ लाख हेल्मेट वितरण मोहिमेची प्रशंसा करत त्यांना शुभेच्छाही दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना आणि नातेवाईकांना हेल्मेट न घालण्याचे धोके आणि वापराचे महत्त्व समजावून सांगावे, तसेच विनाहेल्मेट दिसणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना केले.

# नगराध्यक्षा पदासाठी ९ तर १०२ नगरसेवक रिंगणात

**जामखेड तालुका:** (समर्थ गांवकरी)

नगर पालिका निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी अधिकृत सहा पक्षाचे उमेदवार उभे आहेत.. व तिन अपक्ष उमेदवार उभे आहेत. अधिकृत सहा पक्षाचे उमेदवार असलेतरी खरी लढत. भाजप.. शिवसेना. शिंदे  आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार... या मधेच अटी तटीची होईल असे आजचे राजकीय चित्र आहे.. जसी निवडणूक जवळ येईल तसे तसे चित्र बदलु शकते. जामखेड नगरपरिषद निवडणूकीत अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ९ नगराध्यक्षांपैकी उमेदवारांनी माघार घेतली. तर १२० नगरसेवकांपैकी १८ उमेदवारांनी माघार घेतली आहे. आता नगराध्यक्षपदाचे ९ उमेदवार रिंगणात असल्याने मोठी चुरस पहायला मिळणार आहे. यामध्ये प्रामुख्याने भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी (शप), काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात खरी लढत रंगणार आहे. जामखेड नगरपरिषद निवडणुक जाहीर होताच इच्छुकांच्या गर्दी दिवसागणिक वाढत गेली. वातावरण तापले आहे. नगरसेवक पदासाठी  जामखेड नगरपरिषद नगराध्यक्षा पदासाठी ९ तर नगरसेवकपदासाठी १२० उमेदवारी अर्ज वैध झाले होते.

# गटविकास अधिकारी यांची डोहोळे ग्रामपंचायतीला भेट

**भिवंडी :** (समर्थ गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे गटविकास अधिकारी गोविंद खामकर  यांनी भेट देऊन मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अनुषंगाने कामाचा आढावा घेतला.तसेच ग्रामपंचायतीच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी,विकास कामांची पाहणी केली व स्थानिक समस्यांची माहिती घेण्यासाठी घेतली तर



ग्रामपंचायत मध्ये सप्तसूत्री कार्यक्रम अंतर्गत कातकरी समाजाचे नागरिक यांचे बँक खातेबाबत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॅम्प ला भेट देऊन माहिती घेतली. तसेच जिल्हा परिषद शाळा डोहोळेपाडा येथे प्रत्यक्ष भेट देऊन शाळेची पाहणी केली व शिक्षक,पालक तसेच मुलांसोबत चर्चा केली. गटविकास अधिकारी गोविंद खामकर यांनी सर्व टिम सोबत ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे कार्यालयासमोर माझी वसुंधरा अभियान बाबत माहिती घेऊन कामाची पाहणी केली तसेच, डोहोळे ग्रामपंचायत हद्दीतील नागरी सुविधा जनसुविधा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामाची सर्वासमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच नवीन मंजुर कामाबाबत माहिती घेतली.विशेष म्हणजे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत गावात सुरु शोषखड्डे कामाची साहेबांमार्फत माहिती घेऊन अभियान काळात पुढे करावयाचा योजना उपक्रम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी डोहोळे ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# नगर जिल्हा शासकीय रूग्णालयातील दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळ्यात सिव्हिल सर्जनला पोलिसांची नोटीस

**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

जिल्हा शासकीय रूग्णालयातील दिव्यांग प्रमाणपत्र प्रक्रिया गंभीर गैरव्यवहारात अडकली असल्याचे आर्थिक गुन्हे शाखेच्या तांत्रिक तपासातून उघड झाले आहे. दस्तऐवजांची पडताळणी करताना तब्बल १४२ दिव्यांग प्रमाणपत्रे डबल जावक क्रमांकाने नोंदवून जारी केल्याचे धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संशयास्पद प्रमाणपत्रांबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांना नोटीस बजावून सर्व माहिती तातडीने सादर करण्याचे



आदेश देण्यात आले आहेत. दिव्यांग प्रमाणपत्र प्रणालीतील आयडी व पासवर्ड चोरी झाल्याची फिर्याद तोफखाना पोलीस ठाण्यात सुमारे एक वर्षापूर्वी दाखल होती. हा तपास दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी याची गंभीर दखल घेत प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केले. आर्थिक शाखेच्या पथकाने तपासाला गती देत डिजिटल आणि दस्तऐवजांचा तपास केला. त्यात डबल जावक क्रमांक वापरून जारी केलेल्या १४२ संशयास्पद प्रमाणपत्रांचा खुलासा झाला. या संशयास्पद प्रमाणपत्रांबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांना नोटीस बजावून सर्व माहिती तातडीने सादर करण्याचे आदेश पोलिसांनी दिले आहेत. आर्थिक गुन्हे शाखेने जिल्हा शासकीय रूग्णालयाकडून सर्व नोंदी, प्रमाणपत्रे, लॉगिन माहिती व संबंधित अधिकारी- कर्मचाऱ्यांची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले असून, आणखी काही अधिकारी वा एजंट यात सहभागी असण्याची शक्यता तपासली जात आहे.

आतापर्यंतच्या तपासात एकूण नऊ संशयित आरोपींची भूमिका निष्पन्न झाली आहे. यामध्ये तिघे जिल्हा रूग्णालयातील कर्मचारी आहेत. काही आरोपींना अटक करण्यात आली असून काहींना उच्च न्यायालयाकडून तात्पुरता जामीन मिळाला आहे. तर दोन आरोपी अद्याप पसार असून त्यांचा शोध सुरू आहे. एका संशयित आरोपीचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी आरोपींची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# कान, नाक, घसा तपासणी शिबिरात ८० रुग्णाची तपासणी

समाजातील सर्वच घटकांच्या आर्थिक योगदानामुळे आनंदऋषीजी हॉस्पिटल ची प्रगती होत आहे.चांगल्या व गुणवत्तापूर्वक मिळणाऱ्या आरोग्य सेवेसाठी तसेच बायपास सर्जरीसाठी बाहेरच्या राज्यातूनही रुग्ण येत आहेत. आयुष्मान भारत या योजनेमुळे आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य भारतभर पोहोचले आहे.

## आनंदऋषीजी हॉस्पिटलचे मानवसेवेचे कार्य कौतुकास्पद - आमदार संग्राम जगताप





**अहिल्यानगर :** (समर्थ गांवकरी)

आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने व प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य मंदिरात गेल्या पंचवीस वर्षापासून सातत्याने रुग्णसेवेच्या माध्यमातून मानवसेवेचे कार्य सुरू आहे.दरवर्षी बारा महिने विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून रुग्णसेवेचा महायज्ञ सुरू आहे.

या शिबिरासाठी डॉ.प्रकाश कांकरिया, सुधाताई कांकरिया यांचे योगदान लाभत आहे. जगाच्या पाठीवर वैद्यकीय क्षेत्रात आलेली नवीन तंत्रज्ञान व प्रणाली अहिल्यानगर येथे आणण्यासाठी जैन सोशल फेडरेशनचे कार्यकर्ते प्रयत्नशील असतात.रुग्णांच्या तपासणी व उपचारासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत अशी प्रणाली उपलब्ध आहे.या हॉस्पिटलमध्ये मिळणाऱ्या रुग्णसेवेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातीलच नव्हे. तर देशभरातून रुग्ण येत आहेत. भारत देश हा धर्माला मानणारा देश आहे. येथे येणाऱ्या रुग्णांना दवा सोबत दुवाही मिळत असते.येथे येणाऱ्या रुग्णांना आनंदऋषीजी महाराजांचा आशीर्वाद मिळतो. याची प्रचिती अनेकांना आलेली आहे.जैन सोशल फेडरेशनने "भगवान महावीर युनिव्हर्सिटी" हा महत्त्वाकांक्षी शैक्षणिक प्रकल्प भगवान महावीर यांच्या नावाने सुरू केलेला आहे. उद्याच्या काळात "भगवान महावीर युनिव्हर्सिटी" या विद्यापीठाचे नाव शैक्षणिक क्षेत्रात भारतभर होईल. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे मानवसेवेचे कार्य कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये कान,नाक,घसा तपासणी शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. शिबिराचे आयोजन प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधाताई कांकरिया,स्व.कन्हैयालालजी एवंम स्व.माणकंवरबाई कांकरिया यांच्या स्मृती प्रित्यर्थ व कांकरिया परिवाराचे वतीने करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख उपस्थितीत डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधाताई कांकरिया जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया, संतोष बोथरा,सतिश लोढा, निखिलेंद्र लोढा,माणकचंद कटारिया,प्रकाश छल्लाणी, डॉ.आशिष भंडारी, सुभाष मुनोत,वसंत चोपडा, शिबिराचे तज्ञ डॉक्टर डॉ.सुकेशिनी गाडेकर,डॉ.अतुल तुपे,डॉ.सुरज कर्डिले ,वाच्या व भाषा उपचार तज्ञ डॉ.अझर शेख आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,स्वआमदार अरुण काका जगताप यांनी हॉस्पिटलच्या उभारणीसाठी अमुल्य असे योगदान दिले आहे.जैन सोशल फेडरेशनच्या कार्यकर्त्यांना वेळोवेळी प्रोत्साहनही दिले आहे. गेल्या दहा वर्षापासून आमदार संग्राम जगताप यांचे वेळोवेळी हॉस्पिटलच्या कार्यात सहकार्य केले आहे.शहराचा विकास चारही बाजूने झपाट्याने होत आहे. सकाळी सात ते रात्री बारापर्यंत अहोरात्र कार्य करणारे आमदार संग्राम जगताप यांच्या सारखे नेतृत्व शहराला लाभले आहे. डॉ.प्रकाश कांकरिया यांचे वडील स्व.कन्हैयालाल कांकरिया हे प्रतीथयश न्यायाधीश होते.व मातोश्री स्व.माणकंवरबाई कांकरिया या स्वातंत्र्य सेनानी होत्या.यांच्या सामाजिक कार्याचा वारसा कांकरिया परीवाराला लाभलेला आहे.

# PATH तर्फे बालदिनानिमित्त नोटबुक व पेन वितरण; समाजसेवक नानजीभाई ठक्कर उपस्थित!

## सेठ नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांचे मोलाचे योगदान!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

पीपल्स असोसिएशन फॉर ट्रेनिंग अँड हेल्थ (PATH) तर्फे बालदिनानिमित्त बीएमसी गार्डन, अनुशक्तीनगर, मानखुर्द येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात ३० विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ नोटबुक व १ पेनचे वाटप करण्यात आले.

सुमारे तीन महिन्यांपूर्वी सेठ नानजीभाई खिमजीभाई ठानवाल यांनी PATH ला ६० नोटबुक व ६० पेनचे उदार दान केले होते. बालदिन साजरा करताना हे साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा PATH चा संकल्प या कार्यक्रमातून पूर्ण झाला.

बागेत खेळ, उपक्रम आणि उत्साह : १७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता मानखुर्दच्या महाराष्ट्र नगर येथून विद्यार्थ्यांना बागेत आणण्यात आले. PATH तर्फे वाहन भाड्याने घेऊन विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यात आली.

बागेत विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ व मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत बालदिन साजरा केला.

प्रमुख अतिथी आणि उपस्थित मान्यवर : या कार्यक्रमासाठी जनभूमी प्रेसचे श्री. राजू अभंग यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

PATH तर्फे सचिव श्रीमती अल्फोन्सा सिक्वेरिया, श्रीमती उज्मा शेख, श्री. संजय सरवडे, श्रीमती यास्मीन शेख, श्रीमती नगमा, सुश्री गुलक्षा व सुश्री आफरीन उपस्थित होत्या.

तसेच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) मुंबईच्या श्रीमती आर्यन आणि सुश्री आयशा यांनीही सहभाग नोंदवला.

नोटबुक वाटप आणि आभार प्रदर्शन : दुपारी १ वाजता उपक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्यांना नोटबुक व पेनचे वितरण करण्यात आले.

वाटपाची प्रक्रिया श्री राजू अभंग, श्रीमती अल्फोन्सा सिक्वेरिया आणि श्री संजय सरवडे यांच्या हस्ते पार पडली.

कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती आर्यन यांनी प्रमुख पाहुण्यांचे व सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.



PATH तर्फे आयोजित हा उपक्रम केवळ बालदिनाचे औचित्य नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रेरणा निर्माण करण्याचा सुंदर उपक्रम ठरला.



## थोडक्यात बातम्या...

### शेतकऱ्यांचे अनुदान तात्काळ खात्यावर जमा करा : प्रकाश बापु ठुबे



वैजापुर (स. गांवकरी) : अतिवृष्टी झाल्यानंतर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्यांचे अनुदान लवकरात लवकर शेतकयांच्या खात्यात जमा करा अन्यथा तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे यांनी प्रशासनाला दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदश्चंद्र पवार गट) वतीने तहसीलदार यांना दुष्काळी अनुदान तात्काळ मिळावे यासाठी निवेदन देण्यात आले त्या निवेदनात म्हणटले आहे की, दि. २८ व २९ आक्टोंबर रोजी महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली यामध्ये वैजापुर तालुक्यातील शेतकर्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून नेला. दुभती जनावरे पाण्याच्या पुरात वाहुन गेली. मका, कापुस सोयाबीन यांचे मोठे नुकसान झाले. सरकारने तत्परता दाखवत त्यांना तात्काळ मदत करण्याची घोषणाही केली. त्यानंतर पंचनाम्यांची प्रक्रिया सुरु केली परंतु ई-केवायसी नसेल तर अनुदान जमा होण्यास अडचणी निर्माण झाल्या. शासनाने जाहीर केलेले अनुदान अत्यल्प होते. शेतकऱ्यांचे नुकसान पाहता मिळणारे अनुदान पुरेशे नव्हते. त्यानही ई-केवायसी नसल्यामुळे शेतक-यांना सेतु केंद्रावर चकरा माराव्या लागत आहेत हि सर्व परास्थिती बघता शासनाने ई-केवायसी करण्यासाठीची आवश्यक बेवसाईट तात्काळ सुरू करावी आणि शेतक-यांच्या खात्यात पुरेसे अनुदान जमा कराने अन्यथा तहसील कार्यालयासमोर २० नोव्हेंबर पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही यावेळी तालुकाध्यक्ष प्रकाश बापु ठुबे यांनी दिला असून या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे पाटील, शहराध्यक्ष जुबेर भाई चाऊस, जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया सावंत पाटील, काँग्रेसचे नेते दिगंबर वाकचौरे , नारायण पवार माजी उपसरपंच , काकासाहेब मोगल, दादासाहेब डुकरे आदिंच्या सह्या आहेत.

### १४६ कोटी नुकसानभरपाई मंजूर

नेवासा (स. गांवकरी) : तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे झालेले प्रचंड नुकसान अजूनही भरून न निघाल्याने अखेर जनक्षोभाचा उद्रेक होताना दिसला. 2025 मधील अतिवृष्टीला अनेक आठवडे उलटूनही शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाईचा एकही रुपया जमा होत नव्हता. पंचनामे पूर्ण, याद्या जाहीर—सर्व प्रक्रिया संपली; पण प्रशासन मात्र "फाईल हलवायची तर उद्या, निर्णय घ्यायचा तर नंतर" अशा पद्धतीने ढिसाळ कामगिरी करत होते.शेतकऱ्यांची आर्थिक अवस्था ढासळत असताना तहसील कार्यालयातील निष्क्रियता ही जाणीवपूर्वक दुर्लक्ष की अकार्यक्षमता? असा प्रश्न चर्चेत आला होता. शेती हंगाम डोळ्यांसमोर येत असताना शेतकरी भरपाईची वाट पाहत होते आणि प्रशासन मात्र राजरोसपणे वेळकाढूपणा करत होते. ही परिस्थिती ओळखून जीवन ज्योत फाऊंडेशन पुढे सरसावले. संघटने ने तालुक्यातील वंचित शेतकऱ्यांचा आकडा, पंचनामा तपशील आणि नुकसानभरपाई प्रक्रियेतील विलंबाचे पुरावे गोळा करून तहसीलदार व पोलीस प्रशासनाला ठोस निवेदन सादर केले.

### कळवण भादवण–पिळकोस–विसापूर जोड रस्ता बंद

कळवण तालुका (स. गांवकरी) : शासनाची महत्त्वाकांक्षी संकल्पना "शेत तिथे रस्ता, गाव तिथे रस्ता"... कागदोपत्री सुंदर, भाषणांमध्ये गोड, पण प्रत्यक्षात मात्र कळवण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हारी लागणारा गंभीर प्रश्न! भादवण तळ्यावपांदी – पिळकोस – विसापूर हा दोन गावांना जोडणारा महत्त्वाचा ग्रामीण रस्ता गेल्या आठ महिन्यांपासून पूर्णपणे बंद आहे. शेतीकामासाठी, विद्यार्थ्यांसाठी, रुग्णांसाठी, महिलांसाठी आणि सर्वसामान्य ग्रामस्थांसाठी हा रस्ता जीवनवाहिनी होता. पण आज तो प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मृतप्राय झालेला आहे. मा. मुख्यमंत्री साहेबांनी सुरू केलेल्या शिवार जोड रस्ता योजनेअंतर्गत हा रस्ता तातडीने दुरुस्त व्हायला हवा होता. मात्र संबंधित मा. प्रांत अधिकारी, तहसीलदार, PWD विभाग, स्थानिक तलाठी आणि ग्रामसेवक यांच्या उदासीनतेमुळे दोन गावांना जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता मुदतवाढीवर टाकून ठेवला आहे.

# अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध

- २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना मतदार व तक्रारदारांसाठी स्वतंत्र नमुना अर्जात दाखल करता येणार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी विधानसभेच्या मतदार यादीच्या आधारे तयार केलेल्या मतदार याद्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १४ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रासाठी दि. १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ ते १७ मध्ये विभागून प्रभागनिहाय छापून घेत



अधिप्रमाणित केलेली आहे.

सदर मतदार याद्या गेल्या गुरुवार दि. २० नोव्हेंबर रोजी महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना माहितीसाठी मुख्य प्रशासकीय कार्यालय व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. अहिल्यानगर महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.amc.gov.in येथे फोटो विरहित मतदार यादी निःशुल्क पहाणेसाठी उपलब्ध आहे.

सदरच्या मतदार यादीबाबत हरकती / सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात दिनांक २० नोव्हेंबर २०२५ ते दि.२७ नोव्हेंबर २०२५ अखेर कार्यालयीन वेळेत अहिल्यानगर महानगरपालिका मुख्य कार्यालय (नविन प्रशासकीय इमारत), प्रभाग समिती कार्यालय क्र. १ सावेडी, प्रभाग समिती कार्यालय क्र. २ शहर, प्रभाग समिती कार्यालय क्र.३ झेंडीगेट, प्रभाग समिती कार्यालय क्र.४ बुरुडगाव या ठिकाणी स्विकारण्यात येतील. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही.

विधानसभेची मतदार यादी महानगरपालिकांच्या प्रभागानुसार विभागून ती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार करणे व अधिका-यांनी अधिसूचित करणे या प्रयोजनासाठी दि. १ जुलै, २०२५ हा दिनांक अधिसूचित केला असून, या दिनांकास अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करून अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीकरीता प्रारूप मतदार याद्या तयार करण्यात आल्या आहेत. असे करीत असताना सदर मतदार यादीमध्ये मूळ विधानसभा मतदार यादीत नसलेली कोणतीही नवीन नावे समाविष्ट करण्याचे अथवा मूळ विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे; तसेच त्यामध्ये कोणत्याही दुरुस्त्या करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास किंवा राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीकरिता प्राधिकृत केलेल्या अधिका-यास नाही.

माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १ ते १७ करीता तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादींबाबत काही हरकती व सूचना दाखल करावयाच्या असतील अशा मतदारांनी नमुना अ मध्ये आणि तक्रारदारांनी नमुना ब मध्ये (नमूना 'अ' व 'ब' महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.), उपरोक्त विहीत कालावधीत हरकती व सूचना दाखल कराव्यात. प्राप्त होणा-या हरकती व सुचनांवर १) लेखनिकांच्या काही चुका, २) दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, ३) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे, ४) मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती किंवा सूचना प्राप्त झाल्यास अशा सुधारणा / दुरूस्ती करता येतील. अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १ ते १७ करीता तयार करण्यात आलेल्या फोटोसहीत प्रभागनिहाय प्रारुप मतदार याद्या माननीय राज्य निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार प्रति पृष्ठ रु. २/- याप्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिका येथे विक्रीस उपलब्ध आहेत.

# इच्छुक उमेदवारांनी बांधले गुडघ्याला बाशिंग

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यात नगरपंचायती, नगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांची रणधुमाळी चालू झाली असल्यामुळे ऐन थंडीत वातावरण तापू लागले आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे इच्छुक उमेदवार मतदारांना धार्मिक स्थळे व पर्यटन स्थळांना नेऊन विविध प्रलोभने दाखवत आहेत. काही इच्छुक उमेदवार तर आतापासूनच मंदिरांमध्ये जाऊन निवडणुकीसाठी व आपल्याला पक्षाचे तिकीट मिळण्यासाठी अडथळे येऊ नये म्हणून होमहवन करू लागले आहेत. देवाबरोबरच गावागावातील जेष्ठ नागरिकांचे आशीर्वादही घेऊ लागले आहेत. जिल्हा परिषदेला व पंचायत समितीला अमूक पक्षाची उमेदवारी मिळावी म्हणून अनेक उमेदवार पुढऱ्यांचे व पक्षप्रमुखांचे उंबरठे झिजवू लागले आहेत. बऱ्याचशा गटामधील इच्छुक उमेदवार निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला नसला तरी आपण केलेली कामे जाहिरात व पत्रकांद्वारे छापून मी कसा स्वच्छ उमेदवार आहे हे लोकांना घरोघरी जाऊन पटवून देत आहेत. बरेचशे उमेदवार तर आपण प्रचारात आघाडी मारली असून तीन ते चार फेरे मतदारांपर्यंत झाले असल्याचे सांगून आपणच निवडून येणार असल्याचा दावा करू लागले आहेत.

# वाळवणे येथे श्री भैरवनाथ देवस्थानात नातजन्मोत्सव उत्साहात संपन्न

- आमदार काशिनाथ दाते यांचा सत्कार

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

वाळवणे येथील श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने नातजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या धार्मिक सोहळ्याला पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विशेष उपस्थिती लावली.

देवस्थानात दर्शन घेऊन त्यांनी भाविकांसोबत नातजन्मोत्सवाची पूजा-अर्चा केली.

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या ज्योती पठारे आणि देवस्थान ट्रस्टच्या वतीने आमदार काशिनाथ



दाते यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन भव्य सत्कार व सन्मान करण्यात आला.

आमदार दाते यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला आणि देवस्थानाच्या विकासाबाबत चर्चा केली. कार्यक्रमास देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष नितीन पठारे, माजी सरपंच उत्तमराव पठारे, चंद्रकांत पठारे, रमेश दरेकर, हरिचंद्र थोरात, प्रमोद शिंदे, पोपट पठारे यांच्यासह वाळवणे व परिसरातील शेकडो ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नातजन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थान परिसर भाविकांनी गजबजून गेला होता.

आमदार काशिनाथ दाते साहेबांनी वाळवणे भैरवनाथाच्या नातजन्मोत्सवाला उपस्थित राहून देवस्थानला व ग्रामस्थांना खूप मोठा मान दिला. त्यांच्यासारख्या लोकप्रतिनिधीने ग्रामीण भागातील धार्मिक व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी वेळ काढला, हे आम्हा सर्वांसाठी अभिमानास्पद आहे. देवस्थानच्या विकासासाठी त्यांनी नेहमीच साथ दिली आहे आणि पुढील काळातही ती मिळेल असा विश्वास आहे. भैरवनाथाच्या कृपेने आमचे गाव व देवस्थान अधिकाधिक प्रगत होईल.

**- ज्योती पठारे**
**(सामाजिक कार्यकर्त्या)**

# रापरमध्ये रामानंदी साधू समाजाचे भव्य संमेलन व हरि उत्सव उत्साहात संपन्न!

**रापर : (समर्थ गांवकरी)**

श्री वागड रामानंदी साधू सेवा ट्रस्ट, रापर तसेच श्री रापर तालुका रामानंदी साधू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ व १३ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य संमेलन आणि हरि उत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. या उत्सवात मंदिराचे भूमिदाता श्री देवीदास साधू व साधू कुटुंबाचे नेते विशेष उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही तालुक्यातील विविध गावांमधील साधू समाजातील कुटुंबांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून



विशेष आरती, पूजन व सत्संगाचा लाभ घेतला. कार्यक्रमाला श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर, श्री रामदास बापू, डॉ. के.जी. वैष्णव, डॉ. मनोज बाबुलाल साधू, देविदास साधू (मुंबई), अनिलभाई साधू, नवीनभाई साधू, अरविंदभाई साधू, सुरेशभाई साधू, हिनाबेन साधू, त्रिभुवनदास साधू, शांतीदास साधू, परसोतम साधू, गोपाल साधू, विपुल साधू, कांतीलाल साधू, प्रेमदासभाई साधू, रसिकलाल साधू यांसह राधनपूर ते भुजपूर परिसरातील साधू समाजाचे बहुसंख्य बंधू-भगिनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित होते. समाजवाडी सत्संग हॉलचे देणगीदार नानजीभाई ठककर यांचे मार्गदर्शन समाजवाडीच्या सत्संग हॉलचे प्रमुख देणगीदार श्री नानजीभाई खिमजीभाई ठककर (ठाणावाला) म्हणाले— "दरवर्षी साधू समाजाचे संमेलन एनकेटीच्या सहकार्याने नवे उत्साह आणि नवे संकल्प घेऊन साजरे केले जाते. समाजातील प्रत्येक कार्यकर्त्याने शिक्षणावर भर दिला तर समाज मजबूत व आनंदी बनेल. डॉक्टर, समाजसेवक व कार्यकर्त्यांचे योगदान अनुकरणीय आहे." ते पुढे म्हणाले की, देविदास साधू मुंबईत वास्तव्य करत असले तरी समाजासाठी त्यांचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. भविष्यात सर्व साधू समुदायांनी एकत्र येऊन आणखी भव्य समाजवाडी बांधण्याची आवश्यकता आहे, आणि ते कार्य नक्कीच कुळदेवतांच्या आशीर्वादाने पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी शेठ श्री नानजीभाई खिमजीभाई ठककर (ठाणावाला) यांनी समाजातील बांधवांना साड्या, घड्याळे, पेन व कॅलेंडर यांचे वाटप केले. त्यांच्या उदार देणगीतून आणि समाजहिताच्या भावना लक्षात घेऊन उपस्थितांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. भक्ती, बंधुता आणि सामाजिक एकात्मता यांचे दर्शन घडविणारा हा हरि उत्सव साधू समाजासाठी अविस्मरणीय ठरला.

# केंद्रस्तरीय यशवंतराव चव्हाण कला-क्रीडा महोत्सव तळेरान येथे संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि.१९ नोव्हेंबर २०२५ रोजी तळेरान येथील बारकी वसईवाडी या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये पुणे जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जिल्हा शिक्षण विभाग आयोजित यशवंतराव चव्हाण कला-क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव सन-२०२५/२६ संपन्न झाला. या स्पर्धेत सर्व मुलांचा व शिक्षकांचा आनंद व उत्साह पाहण्यास मिळाला. यशवंतराव चव्हाण कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या प्रमुख बाळासाहेब भालेकर केंद्रप्रमुख सीतेवाडी पारगाव विविध कार्यकारी सोसा यटीचे विद्यमान चेअरमन रोहिदास दाजी गोडे माध्यमि क शिक्षक पतसंस्थेचे संचालक



शंकर घोडे,कैलास गारे,शंकर गोडे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव मुंढे,रामभाऊ लांडे गुरुजी,कैलास डावखर. केंद्रातील शाळांचे मार्गदर्शक शिक्षक मुख्याध्यापकया महोत्सवात सर्व केंद्रातील विद्यार्थी,मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.प्रत्येक विद्यार्थी आपल्या हृदयातून कला,क्रीडा व संस्कृतीची ज्योत घेऊन आला होता. दिवसभर विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्यांचे अद्भुत प्रदर्शन केले.या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी व अध्यक्षस्थानी पारगाव विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन रोहिदास गोडे होते.त्यांनी आपलेशाळेविषयी व स्पर्धेविषयी विचार व्यक्त केले व उपस्थित सर्वांचे स्वागत केले.तदनंतर शंकर घोडे यांनी विद्यार्थ्यांना आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे उपस्थितीत सितेतीवाडी केंद्रातील सर्व शाळांचे शिक्षक विद्यार्थी उपस्थित राहून स्पर्धेत सहभाग घेतला मान्यवर व पालक उपस्थित होते. केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेचे प्रमुख व सीतेवाडीचे केंद्रप्रमुख बाळासाहेब भालेकर शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे जिल्हा प्राथमिक शिक्ष समितीचे कार्याध्यक्ष शिक्षक पतसंस्थेचे संचालक वसईवाडी शाळेचे शिक्षक बाळा साहेब लांघी यांनी केले.सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा व स्पर्धेविषयी माहिती आणि प्रास्ताविक केंद्रप्रमुख यांनी केले.शंकर घोडे यांनी स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यां चा सर्वांगीण विकास व्हावा शालेय शिक्षणात खेळाचे महत्व व खेळासाठी वेळ आणि खेळातील आपल्या जीवनातील महत्त्व याबाबत उद्बोधन केले. वैयक्तिक, सांघिक व सांस्कृतिक स्पर्धा मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न झाल्या या स्पर्धा पाहण्यासाठी परिसरातील क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन अश्या प्रकारच्या स्पर्धा घेणे व त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा असे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

या स्पर्धेतील सर्व विजयी स्पर्धकांना तळेरान गावच्या माजी सरपंच सिंधुताई कैलास गारे यांच्या वतीने ट्रॉफी अनिताताई शंकर घोडे आदर्श शिक्षिका यांच्यावतीने प्रमाणपत्र अनिताताई कैलास डावखर यांच्या व रोहिदास गोडे साहेब यांच्या वतीने 20 किलो लाडू प्रवीण भाऊ लांडे युवा नेते यांच्या वतीने मंडप सौजन्य व शाळेसाठी ग्रामविकास प्रतिष्ठान तळेरान यांच्या वतीने दोन टेबल चार खुर्च्या देण्यात आल्या सर्व बक्षीस दात्यांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले स्पर्धेचे नियोजन देवराम सुपे यांनी कथन केले.शालेय विविध स्पर्धेमध्ये लोकनृत्य,बेडूक उड्या,चमचा लिंबू, बडबड गीते, धावणे,उंच उडी,गोळा फेक,बुद्धिबळ,लंगडी पोवाडा, आट्या-पाट्या, प्रश्नमंजूषा,भजन,कबड्डी व खो खो, वक्तृत्व, वैयक्तिक गायन, कविता गायन या विविध स्पर्धा सर्व मुले ही आपल्या शारीरिक क्षमतांचे प्रदर्शन करताना पाहावयास मिळाले.

मैदानात खेळाचे उत्साहपूर्ण वातावरण पाहण्यास मिळाले. विजेत्यांना प्रशस्तीपत्र व बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना पुढील बीटस्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सर्वांना लापसी मोतीचूर लाडू भात आमटी असे स्नेहभोजनाचा आस्वाद देण्यात आला.

# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये क्रीडा महोत्सवाची तयारी जोरात

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा मध्ये येथे २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२५ उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या बाबतची तयारी जोरात चालू आहे.

दि. ४ ते ८ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या या भव्य क्रीडा महोत्सवात राज्यातील विविध विद्यापीठांचे खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या महोत्सवात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, ऍथलेटिक्स, बॅडमिंटन, टेबल टेनिस आणि बुद्धिबळ या क्रीडा प्रकारांच्या मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील जवळपास ३७२६ खेळाडू सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर ५७६ संघ व्यवस्थापक व मार्गदर्शकही येणार आहेत. या स्पर्धा निर्विवाद पणे पार पाडण्यासाठी राज्यातून २७६ पंच येणार आहेत.

सर्व स्पर्धा सुरळीत पार पाडण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. पदाधिकारी, सदस्य व स्पर्धा मदतनीस मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवाची सर्व तयारी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम तसेच विविध अधिकारी व कर्मचारी क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यरत आहेत. या महोत्सवामुळे राज्यातील विद्यार्थी-खेळाडूंना क्रीडा कौशल्य प्रदर्शनाचे व्यासपीठ तर मिळणारच, तसेच विद्यापीठांमधील क्रीडा संस्कृती अधिक बळकट होणार आहे.



सिन्नर बारागाव पिंपरी शिवरे फाटा मार्गे निफाड या राज्य मार्ग क्रमांक 27 वर या अनेक भागात रस्त्यावरती गतिरोधक टाकण्यात आले आहे. त्यांच्यावर सफेद रंगाचे पट्टे मारले नसल्यामुळे हे गतिरोधक अपघातांना निमंत्रण देत आहे अपघात रोखण्यासाठी या गतिरोधकांवर तातडीने सफेद पट्टे मारावेत अशी मागणी श्री. दत्तात्रय गोसावी (सामाजिक कार्यकर्ते बारागाव पिंपरी) यांनी श्री. सागर बांगरे साहेब (सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता निफाड) यांना निवेदन देत केली आहे. सिन्नर निफाड राज्य क्रमांक 27 वर कानडी मळा, तसेच बारागाव पिंपरी निमगाव, केपानगर ,हिवरगाव, म्हाळसाकोरे ,सह अनेक गावांमध्ये गतिरोधक टाकण्यात आले आहे. वाहनाचा वेग गावाजवळ कमी करण्यासाठी गतिरोधकाची गरज आहे मात्र गतिरोधकावरती सफेद रंगाचे पट्टे न मारल्यामुळे चालकांना न दिसणारे हे गतिरोधक अपघातांना निमंत्रण देणारे ठरत आहे .या गतिरोधकावर झालेल्या अपघातामुळे अनेकांना अपंगत्व आले आहे काहींना जीवही गमवावा लागला आहे.

## थोडक्यात बातम्या...



### धर्मसेवक डॉ.सोन्या पाटील यांच्या समाजसेवेच्या कार्याला नवा वेग

भिवंडी (स. गांवकरी) : समाज कल्याण न्यास महाराष्ट्र राज्य या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व धर्मसेवक डॉ. श्री. सोन्या काशिनाथ पाटील यांच्या प्रेरणेने गेल्या २३ वर्षांपासून ठाणे व पालघर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी तसेच वंचित घटकांमध्ये विविध सामाजिक, आरोग्य व शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. यात आदिवासी महिलांना साडी-मिठाई वाटप, मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वितरण, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वयंरोजगार प्रशिक्षण, नेत्र चिकित्सा शिबिरे, रक्तदान शिबिरे, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा महोत्सव अशा अनेक उपक्रमांचा समावेश आहे. आजच्या जगात माणुसकी हरवत चालली असताना ती जपण्याची गरज अधिक भासते. "इतरांच्या आनंदात आपला आनंद शोधणे व तळागाळातील लोकांच्या समस्या जाणून त्यांचे निरसन करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे हेच खरे समाजसेवा तत्त्व आहे," असे मार्गदर्शन प्रदेश कार्यकारिणी सदस्य व दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक डॉ. श्री. किशोर बळीराम पाटील यांनी केले. ते श्री वरदान मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, नारपोली, भिवंडी येथे आयोजित महिला आघाडी पद नियुक्ती सोहळ्या प्रसंगी बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्षा सौ. नलिनी चौधरी म्हणाल्या, “महिला आघाडीतील प्रत्येक महिला पदाधिकाऱ्यांनी निस्वार्थ भावनेने ‘दादा’ म्हणजेच संस्थापक डॉ. सोन्या पाटील यांच्यासोबत काम करणे गरजेचे आहे. संस्थेचा कोणताही कार्यक्रम असो, त्यात महिलांनी सक्रिय सहभाग देऊन समाजसेवेची साखळी अधिक मजबूत करावी.”

### सांस्कृतिकता, कला आणि मूल्यशिक्षण हीच सर्वांगीण विकासाची पायाभरणी

ठाणे (स. गांवकरी) : सी. पी. गोयेन्का स्कूलच्या सांस्कृतिक कार्यक्रमा प्रसंगी माननीय प्रमुख पाहुणे श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठानावाला, श्रीमती शर्मिला मादीवाले, श्रीमती जयश्री कुमार. श्रीमती दीपा कुलभूषण आदरणीय शिक्षकवर्ग, उपस्थित पालकवर्ग आणि प्रिय विद्यार्थ्यां उपस्थित होते. या प्रसंगेत नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले की आज सी. पी. गोयेन्का स्कूलच्या या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्यासमोर उभे राहताना मला अपार आनंद होत आहे. मुलांच्या प्रतिभेला व्यासपीठ देणारे असे कार्यक्रम ही शाळेची खरी ओळख असते. कारण सांस्कृतिकता, कला आणि मूल्यशिक्षण हीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी असते. आपल्या भारतीय संस्कृतीची शान म्हणजे विद्या, कला आणि संस्कार. फक्त पाठ्यपुस्तकातील ज्ञान पुरेसे नाही; तर जीवन जगण्यासाठी लागणारी मूल्ये, कर्तव्यभावना, सहकार्य, आदर, शिस्त आणि सर्जनशीलता — ही सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना अशा कार्यक्रमांतून शिकायला मिळतात. शिक्षण म्हणजे फक्त परीक्षेत मिळालेले गुण नाहीत; शिक्षण म्हणजे प्रत्येक मुलामध्ये दडलेल्या व्यक्तिमत्त्वाचे सुंदर घडवणे. मुलांमध्ये असलेल्या कलेचा, आत्मविश्वासाचा आणि त्यांच्या स्वप्नांचा सन्मान करणे हीच खरी शिक्षणसंस्कृती आहे.

### दिमाखात पर्यटन करा आणि स्मार्ट शॉपिंग करा!

मुंबई (स. गांवकरी) : 2025 या वर्षाची अखेर जवळ आली असताना अनेक जण छोट्या किंवा मोठ्या सुट्ट्यांचे नियोजन करत आहेत. प्रवासाचे बुकिंग, हॉटेलचे बुकिंग करण्यापासून ते नवीन कपडे घेणे आणि प्रवासासाठी अत्यावश्यक असलेल्या वस्तूंची खरेदी सुरू झाली असेल. अशा वेळी परफेक्ट ठिकाण शोधण्यासोबतच खर्चाचे व्यवस्थापन स्मार्ट पद्धतीने करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. तुमच्याकडे योग्य क्रेडिट कार्ड असेल तर ते निश्चितच हितकारक ठरेल. क्रेडिट कार्डमुळे सुविधा तर मिळतेच, त्याचप्रमाणे तुम्हाला खास रिवॉर्ड्सही मिळतात. त्यामुळे तुमचा प्रवासाचा आणि खरेदीचा अनुभव अधिक चांगला होतो. एसबीआय कार्ड या भारतातील अग्रगण्य क्रेडिट कार्ड प्रदात्यातर्फे प्रवास आणि लाइफस्टाइलशी संबंधित अनेक सुविधा देण्यात आल्या आहेत, ज्यामुळे तुमच्या सुट्ट्या आणि खरेदीचा अनुभव अधिक फायदेशीर ठरतो. एअर माइल्स, एअरपोर्ट लाउंज ॲक्सेस, कॅशबॅक किंवा लोकप्रिय ब्रँड्सवरील रिवॉर्ड पॉइंट्स असोत, डाइनिंगवरील विशेष ऑफर्स किंवा इंधनावरील बचत असो, या क्रेडिट कार्ड्समध्ये सोय आणि मूल्य यांची सांगड घालण्यात आली आहे. येत्या सुट्टीच्या हंगामामध्ये तुम्हाला अधिक बचत करण्यास मदत करणारे काही आघाडीचे क्रेडिट कार्डचे पर्याय खालीलप्रमाणे आहेत. लक्झरी आणि सोय हे दोन्ही घटक हवे असलेल्या प्रवाशांसाठी एसबीआय कार्ड माइल्स एलिट हा एक प्रीमियम ट्रॅव्हल साथीदार आहे, जो तुमच्या प्रवासाला खास करतो. या क्रेडिट कार्डचे वार्षिक शुल्क ₹4,999 इतके असून हे कार्ड घेतल्यावर वेलकम गिफ्ट म्हणून 5,000 क्रेडिट्स मिळतात. फ्लाइट्स, हॉटेल्स आणि इतर बुकिंगसाठी या क्रेडिट्सचा वापर करता येतो. यासोबत प्रायोरिटी पास मेंबरशिप, देशांतर्गत 8 एअरपोर्ट लाउंजमध्ये आणि 6 आंतरराष्ट्रीय लाउंज मध्ये मोफत व्हिजिट्स, तसेच फक्त 1.99% इतका कमी फॉरेक्स मार्कअप दर मिळतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवास अधिक किफायतशीर ठरतो. या शिवाय 1% फ्युएल सरचार्जची सूट मिळाल्यामुळे दैनंदिन खर्चात बचत होते. हे कार्ड आणखी दोन प्रकारांत उपलब्ध आहे — एसबीआय कार्ड माइल्स प्राइम (₹2,999) आणि एसबीआय कार्ड माइल्स (₹1,499). इंडिगो एसबीआय कार्ड एलिटमुळे तुमचा प्रवासाचा अनुभव आणखी समृद्ध होतो आणि प्रीमियम रिवॉर्ड्स तसेच खास सुविधा मिळतात. या कार्डचे जॉइनिंग आणि वार्षिक शुल्क ₹4,999 (कर अतिरिक्त) आहे. यामध्ये आकर्षक ट्रॅव्हल रिवॉर्ड्स आणि अनेक विशेष लाभ मिळतात. प्रवासाच्या सुविधांमध्ये वर्षाला 8 देशांतर्गत विमानतळ लाउंज व्हिजिट्स (प्रत्येक तिमाहीत 2) आणि 6 आंतरराष्ट्रीय लाउंज व्हिजिट्स (प्रत्येक तिमाहीत 2) मोफत मिळतात.

# नामदार विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे विकासकामांसाठी योगदान

### आ.काशिनाथ दाते सर

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी सातत्याने मतदारसंघातील विकासकामांसाठी पाठबळ दिल्याने गेली वर्षभरात नगर व पारनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे करता आली असल्याचे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केले आहे. निघोज व रेनवडी परिसरातील तीन कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आर एस कापसे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, ज्येष्ठ नेते दत्ता नाना पवार, माजी पंचायत समिती सदस्य दिनेश बाबर, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, वडनेर हवेलीचे सरपंच लहू भालेकर, राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकजदादा कारखिले, सरपंच चित्राताई वराळ पाटील, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊलीशेठ वरखडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, युवा नेते रविशेठ लंके, ज्येष्ठ नेते शिवाजीराव डेरे, युवा नेतृत्व विशाल डेरे, दत्तात्रय घोगरे, किसनराव घोगरे, शिवराज कदम, निवृत्ती वरखडे, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार परिसरातील सरपंच, उपसरपंच व सोसायटीचे पदाधिकारी व संचालक मंडळ व ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार दाते सर म्हणाले गेली वर्षभरात नगर तालुका व पारनेर तालुक्यातील गाव व परिसरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे मार्गी लागली आहेत. यामध्ये रस्ते, जलसिंचन, आरोग्य, शाळा आदी महत्त्वपूर्ण प्रश्न सोडविण्यासाठी महायुतीसरकारने प्रयत्न केले आहेत. निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ व राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले यांनी विविध विकासकामांचा पाठपुरावा विखे पाटील यांच्याकडे केल्याने परिसर विकासासाठी गती आली आहे. एक सक्षम नेतृत्व म्हणून वराळ पाटील व कारखिले कार्यरत आहेत. आपण लोकांच्या आरोग्यचा प्रश्न सोडवीताना तालुक्यातील हजारों रुग्णांना २५ हजार रुपये ते एक लाखांपर्यंत सात कोटीची मदत राज्य सरकारच्या वतीने केली आहे. ही एक उच्चांकी मदत असून या माध्यमातून हजारो कुटुंबांना लाभ मिळाला आहे. जलसंपदामंत्री विखे पाटील यांनी पाटपाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी चारशे कोटीचा निधी उपलब्ध करून दिला असून लवकरच हे काम सुरू होणार आहे. या कामामुळे पाचशे क्युसेक्स पाणी जास्त मिळणार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी खऱ्या अर्थाने विधानसभा निवडणुकीत आपल्याला सर्वतोपरी मदत केल्याने आपला विजय सोपा झाला म्हणून मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे करता आली यापुढील चार वर्षांच्या कार्यकाळात



यावेळी युवा नेते विशाल डेरे व ज्येष्ठ नेते शिवाजीराव डेरे यांनी प्रास्ताविक भाषनांत विकासकामांची माहिती देत या भागातील विकासकामांना नामदार विखे पाटील, माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ, राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकजदादा कारखिले यांच्या मुळे गती मिळाली असून हा परिसर सातत्याने महायुती सरकारच्या पाठीमागे भक्कमपणे उभा असून यापुढील निवडणुकीत सुद्धा हा परिसर युतीच्या उमेदवारांना विजयी करेल अशी ग्वाही दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवा नेते विशाल डेरे व दत्तात्रय घोगरे यांनी केले तसेच किसनराव घोगरे, कचरुशेठ डेरे यांनी आभार मानले.

तालुका विकासाला आणखी गती येणार असून नामदार विखे पाटील यांचे मार्गदर्शन व माजी खासदार डॉ विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली विकासकामे मोठ्या प्रमाणात होणार आहेत. युती सरकारने अनेक विकासयोजना राबवील्याने ग्रामीण भागाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक ही महायुती एकत्र लढवणार असून या निवडणुकीत जनतेने मोठ्या प्रमाणात सहकार्य करुन आपल्या परिसराच्या गतीमान विकासासाठी महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन आमदार दाते सर यांनी केले आहे. भाजपचे तालुका अध्यक्ष राहुल शिंदे पाटील यांनी खासदार नीलेश लंके यांच्यावर जोरदार टीका केली. गेली पाच ते सहा वर्षात गावांगावात भांडणे लावण्याचा उद्योग विरोधकांनी केला असून फक्त दादागिरी,दडपशाही करीत लोकांना झुलवत ठेवण्याचे काम विरोधकांनी केले असून काम करणाऱ्या लोकांना हिन वागणूक देत विरोधकांनी स्वार्थी राजकारण केले असून विधानसभा निवडणुकीत जनतेने त्यांना हद्दपार केले असून आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत जनता विरोधकांना कायमचे हद्दपार करील तसेच महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करेल असा विश्वास व्यक्त केला. जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांनी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या कामांचे कौतुक करताना सांगितले की आमदार दाते सर यांनी वर्षभरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सक्षम काम केले असून येत्या चार वर्षांत तालुक्यातील विकासकामांना गती येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आर एस कापसे यांनी सांगितले की विकासकामे करताना कोण आमचा व कोण त्यांचा हे न पाहता आमदार दाते सर यांनी विकासकामांचा सपाटा सुरू ठेवला आहे. गेली वर्षभरात तालुक्यातील प्रत्येक गावांत मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. तसेच नगर तालुक्यातील गावांत सुद्धा मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. तालुका विकासाला मोठ्या प्रमाणात गती आली असून प्रत्येक गावात कामे झाल्याने लोक यापुढील काळात महायुती सरकारच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले यांनी आमदार काशिनाथ दाते सर हे कामाचा माणुस असल्याने तालुका विकासाला गती मिळाली असून आगामी निवडणुकीत त्याचा प्रत्यय येईल असा विश्वास व्यक्त केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे यांनी यावेळी सांगितले की महायुती सरकारच्या माध्यमातून लाडकी बहीण योजना , शेतकऱ्यांना कर्जमाफी तसेच विकासाभिमुख योजना राबविण्यात आल्या.

केंद्र व राज्य सरकार एका विचाराचे असल्याने हे शक्य झाले आहे. जनतेने लोकसभा निवडणुकीत चूक केली.नंतर मात्र विधानसभा निवडणुकीत दुरुस्ती केली म्हणून बरे झाले अन्यथा तालुक्याचा विनाश झाला असता. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक ही पुन्हा एकदा तालुक्यातील जनतेची अस्मीतेची लढाई असल्याने या निवडणुकीत जनतेने मोठ्या मताधिक्याने महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन उचाळे यांनी केले आहे. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यावेळी म्हणाले गेली वर्षभरात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. महायुतीचे सरकार सत्तेवर आहे. देशात मोदी व राज्यात फडणवीस सरकार मोठ्या गतीने काम करीत आहेत.

राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रत्येक विकासकामांना मंजुरी देऊन तालुका विकासाला गती दिली आहे.

आमदार दाते सर हे कार्यक्षम व कार्यसम्राट नेतृत्व आहे. कोट्यवधी रुपयांची विकासकामे करताना त्यांनी सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने काम केले आहे. राजकारण व समाजकारण यांचा ४५ वर्षांचा मोठा अनुभव असल्याने मतदारसंघातील प्रत्येक गावात त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने विकासकामे केली आहेत. आगामी निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन वराळ पाटील यांनी केले आहे.

# माध्यमिक आश्रमशाळा येथे डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते सतरंजी व घड्याळ वाटप!

### डॉ. विश्वासराव आरोटे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पिंपळदरी (ता. अकोले) येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि दैनंदिन उपयोगासाठी सतरंजी व घड्याळ वाटप कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे उपस्थित होते. डॉ. आरोटे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्व, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संघर्षशीलता आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा दिली.



त्यांच्या हस्ते आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सतरंजी तसेच घड्याळांचे वाटप करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील शिस्तबद्धता व दैनंदिन जीवनातील वेळेचे नियोजन अधिक सुकर होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला दैनिक समर्थ गांवकरी चे व्यवस्थापक सन्मा. संजयजी फुलसुंदर यांची विशेष उपस्थिती लाभली.

त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत ग्रामीण विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य उज्वल करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमास आश्रमशाळेतील सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

वाटप सोहळ्यादरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसून येत होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर शब्द देत त्यांचे मनोबल वाढवले आणि भविष्यात अशा उपक्रमांमुळे शिक्षणास अधिक चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

# अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणास भक्तिमय सुरूवात

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

गोविंद महाराज केंद्रे, आळंदी येथे भक्तिभावाने आणि उत्साहात अखंड हरिनाम सप्ताह तसेच ज्ञानेश्वरी पारायण या पवित्र कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. पहाटे काकड आरतीने कार्यक्रमाचे मंगल उद्‌घाटन करण्यात आले. परिसरात सर्वत्र ‘हरिनाम गजर वृंदावना’ च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले आणि परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या प्रसंगी मंदिराच्या उभारणीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारे श्री नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले की, “हे मंदिर २३१ फूट उंच ‘भूमिदाता’ काशिमा खीमजीभाई ठक्कर यांच्या प्रेरणेने उभे राहिले आहे. भगवानाच्या कृपेने आज





मंदिराची भव्य निर्मिती साकार झाली असून लवकरच सोन्याच्या मुकुटाचे कामही सुरू होणार आहे. आमचा परिवार भाग्यशाली आहे की लाखो भाविक येथे येऊन दर्शन घेतात.” तसेच त्यांनी पुढे सांगितले, “आषाढी वारीदरम्यान दरवर्षी ५ ते ६ लाख भाविक दर्शनासाठी येतात. मंदिराजवळच अन्नक्षेत्र सुरू करण्याचा संकल्पही आम्ही केला आहे.” कार्यक्रमास उपस्थित डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मंदिराच्या भव्य रचनेबद्दल बोलताना म्हटले, “हे मंदिर एका उंच डोंगराप्रमाणे उभारले गेले आहे. अशी भव्य निर्मिती ईश्वराचीच कृपा आहे. आपण राहिलो नाही तरी हे मंदिर सदैव लक्षात राहील.”

तसेच विष्णू महाराज केंद्रे यांनी आपली वर्षोंची सेवा व्यक्त करताना सांगितले, “मी अनेक वर्षांपासून या मंदिरात सेवा व कीर्तन करीत आहे. या सेवाभावाचे मूळ कारण म्हणजे नानजीभाई ठक्कर यांचे योगदान. मला मिळालेली मान–पदवी त्यांच्या आशीर्वादामुळेच आहे.” कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून थोर समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर ठाणावाला उपस्थित होते. यावेळी श्री विष्णू महाराज केंद्रे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, जयन्त बिल्डर्स, कांताबाई राजगुरूवाला, शंकरशेठ, नवनाथ जाधव, भास्कर महाराज, मनोहर दिवाणे (भारती), श्री दिनेशभाई ठक्कर, श्री फिरोजभाई पटेल, श्री चंद्रकांत डुंबरे, श्रीमती नयना डुंबरे तसेच हजारो वारकरी भक्त मोठ्या उत्साहात उपस्थित होते. कार्यक्रमातील पँदमाल व प्रसादाचे व्यवस्थापन दोन्ही वेळा भास्कर महाराज यांच्या देखरेखीखाली सुरळीतपणे पार पडले. श्रद्धा, सेवा व हरिनामाच्या गजरात सुरू झालेला हा सप्ताह पुढील सात दिवस भक्तांना अध्यात्मिक ऊर्जा देत राहणार आहे.

# इंडसर्च तर्फे बारावी आंतरमहाविद्यालयीन संशोधन प्रबंध स्पर्धा संपन्न

■ आयबीएस पुणे चे कीर्ती मोटवानी व हितेश मोटवानी ठरले विजेते



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इंडसर्चच्या प्रोफेसर प्रमोद पारखी सेंटर फॉर बँकिंग, फायनान्स अँड इन्श्युरन्स तर्फे बारावी आंतरमहाविद्यालयीन संशोधन प्रबंध स्पर्धा (इंटर कॉलेजिएट रिसर्च पेपर कॉम्पिटिशन) आयोजित करण्यात आली होती. टेरिफ वर्सेस फ्री ट्रेड : विच विल स्ट्रेंथन द ग्लोबल इकॉनॉमी ? ही या स्पर्धेची संकल्पना होती. ही स्पर्धा इंडसर्चच्या बावधनच्या कॅम्पसमध्ये पार पडली. या स्पर्धेचे उदघाटन विलो इंडियाचे चीफ सेल्स ऑफिसर (मुख्य विक्री अधिकारी) डॉ. रवींद्र उटगीकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी इंडसर्चचे सरसंचालक डॉ.अशोक जोशी, संचालिका डॉ.अपर्णा टेंबुलकर, युजी प्रोग्रॅमच्या डीन व इंटरनॅशनल रिलेशन्सच्या प्रमुख डॉ.सुनिता जोशी,आयोजन समितीच्या अध्यक्ष प्रा.डॉ. रुपाली गुप्ते आणि मंदार पारखी आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत महाराष्ट्रासह इतर राज्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत 8 महाविद्यालयांतील 26 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून एकूण 11 संशोधन प्रबंध सादर करण्यात आले. डॉ. रुपाली गुप्ते यांनी स्पर्धेच्या संकल्पनेबाबत थोडक्यात माहिती दिली.

या स्पर्धेत आयबीएस पुणे चे कीर्ती मोटवानी व हितेश मोटवानी हे प्रथम क्रमांकाचे विजेते ठरले. नाशिक येथील जे.डी.सी. बिटको इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्चच्या स्वानंद पारखी व योगेश अहिरे यांनी दुसरे पारितोषिक तर तृतीय पारितोषिक इंडसर्च पुणेच्या अभिषक शेठ व पार्थ गुप्ता यांना मिळाले.

प्रा. तुषार हळबे आणि डॉ. विकास पेशवे यांनी या स्पर्धेत परीक्षकांची भूमिका बजावली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एमबीएच्या द्वितीय वर्षातील रश्मिन वीरकर आणि सायली मगदूम यांनी केले.

ड्रोनाचार्य एरियल इनोवेशन्सची H1 FY 2025–26मध्ये भक्कम डिफेन्स ऑर्डर्समार्फत 20.35%

# PATसह अर्धवार्षिक प्रदर्शनाची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

ड्रोनाचार्य एरियल इनोवेशन्स लिमिटेड, बीएसई एसएमई वरील भारताच्या प्रथम सूचीबध्द ड्रोन स्टार्टअपने 30सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या अर्धवर्षाच्या आपल्या स्टँडअलोन आर्थिक परिणामांची घोषणा केली, ज्यामध्ये तिच्या डिफेन्स, प्रशिक्षण आणि ड्रोन सेवा पोर्टफोलिओमध्ये दीर्घकालीन व्यवसाय गतिशीलता आढळली आहे. H1 FY2025–26साठी कार्यांमधला स्टँडअलोन महसूल ₹ 957.93 लाख एवढा होता आणि एकूण महसूल 1078.18 लाख होता. 30सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या झालेल्या अर्धवर्षासाठी EBITDA ₹ 462.20 लाख असून, करोत्तर निव्वळ नफा ₹194.27 लाख घोषित केला गेला, यावरुन कंपनीच्या कार्यात्मक सर्वोत्कृष्ठतेवर आणि मार्जिन सुधारणेवर असलेला निरंतर भर प्रतिबिंबीत होतो. ड्रोनाचार्य येत्या त्रैमासिकांसाठी खासकरुन शासकीय आणि सुरक्षेशी निगडीत प्रोजेक्ट्ससाठी भारतातील सर्वात जलदगतीने प्रगती करणारी फुल-स्टॅक ड्रोन तंत्रज्ञान संस्थांपैकी एक म्हणून गतिशीलता निर्माण निरंतर सुरु ठेवत आहे. प्रदर्शनाबद्दल मत व्यक्त करताना ड्रोनाचार्यचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक प्रतीक श्रीवास्तव म्हणाले, "H1 FY2025–26एकंदरीत कार्यात्मक सक्षमता दृढ करण्याचा काळ असून सुधारीत मार्जिन त्याचप्रमाणे अधिकाधिक केंद्रित दृष्टीकोनात फलित दिसले. स्वदेशी उत्पादन श्रेणी विकसीत करुन कंपनीने आपल्या सुरक्षा समाधानांचा विस्तार केला आहे. नुकत्याच आलेल्या डिफेन्स ऑर्डर आणि सबळ पाइपलाइनसह, आम्हाला सकारात्मक PAT राखण्याबद्दल विश्वास आहे.

## थोडक्यात बातम्या...




### बामणी, दाभड शिवारात बिबट्याने वासराच्या फडशा पाडल्या

अर्धापूर (स. गांवकरी) : तालुक्यातील बामणी येथील शेतकऱ्यांच्या आखाड्यावरील वासराच्या फडशा पाडला आहेत. गुरुवारी सायंकाळी दाभड येथे एका घराच्या पाठीमागे बिबट्या आढळून आला होता याची सर्वत्र चर्चा झाली तर दि.२१ शुक्रवारी रोजी सकाळी बामणी शिवारात बाबुराव हुडे गट नं.३४ बामणी तालुका अर्धापूर यांच्या आखाड्यावरील गाईचे वासरू बिबट्याने फस्त केले. हि घटना शुक्रवारी सकाळी शेतकरी आखाड्यावर उघडकीस आली आहे. ऐन रब्बीच्या हंगामात शेतीतील कामे मोठ्या प्रमाणात असून बिबट्याचा वावर होत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दाभड बामणी शिवारात बिबट्या आढळल्याच्या अफवा झाली आहे या अफवेमुळे शेतकऱ्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून जनावरे गोठ्यात बांधून खबरदारी घ्यावी तसेच बिबट्या आढळल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन वनविभागाचे वनपाल यु यु मोकळे यांनी केले आहे. यावेळी वनपाल सुनिता कल्ला, वनपाल लक्ष्मण शेळके डॉ.गायकवाड, डॉ. शेख यांनी फडशा पाडलेल्या वासराची तपासणी केली आहे.

### क्रॉम्प्टन अमिओ एअर फ्रायर्स आहाराला स्वादिष्ट आणि सहजसाध्य करतात



मुंबई (स. गांवकरी) : आरोग्यदायी आहार आणि स्वादिष्ट कुरकुरीत खाद्यपदार्थांमधून एकाची निवड करण्याची दुविधा आता संपली आहे. ग्राहकांना दीर्घकाळापासून आरोग्यासाठी स्वादाबाबत तडजोड करावी लागत आहे किंवा परिपूर्ण कुरकुरीतपणासाठी अतिरिक्त तेलाचा वापर करावा लागत आहे. हे आव्हान ओळखत क्रॉम्प्टन ग्रीव्ह्ज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लि. या भारतातील घरगुती नाविन्यतेमधील विश्वसनीय कंपनीने अमिओ एअर फ्रायर सिरीज लाँच केली आहे, ज्यासह प्रत्येक आधुनिक किचनसाठी आरोग्यदायी पर्याय सोपे केले आहेत. क्रॉम्प्टनच्या भरवसा व विश्वसनीयतेच्या वारसावर डिझाइन करण्यात आलेली नवीन अमिओ श्रेणी या तडजोडीसाठी दीर्घकालीन सोल्यूशन देते, तसेच प्रत्येक आहार आरोग्यदायी, कुरकुरीत आणि सहजपणे बनवता येणारा असण्याची खात्री देते. पारंपारिकरित्या अधिक तळण्याच्या पद्धतींमध्ये अतिरिक्त तेलाचा वापर केला जातो व शरीरातील फॅट्स वाढतात, तसेच आहार बनवण्यासाठी वेळ देखील लागतो आणि किचनमध्ये अस्वच्छता वाढते. भारतातील आजच्या धावपळीच्या युगात आरोग्य व सोयीसुविधेला एकत्र प्राधान्य दिले जाते. तुम्हाला कुटुंबासाठी कूकिंग करायचे असो किंवा कामानंतर आस्वाद घेण्यासाठी त्वरित स्नॅक तयार करायचे असो, त्वरित, पौष्टिक व चविष्ट आहारासाठी गरज वाढली आहे. अमिओ सिरीज या समस्यांचे निराकरण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, जी असे अप्लायन्स देते, जे वास्तविक कामगिरी व समाधान देते. प्रगत एअर सर्क्युलेशन तंत्रज्ञानाचा वापर करत अमिओ एअर फ्रायर्स वापरकर्त्यांना स्वादिष्ट स्नॅकचा आणि कुटुंबासोबत आरोग्यदायी आहाराचा आस्वाद घेण्याचा आनंद देतात, जेथे शांतपणे कार्यसंचालन करताना आहारामधील स्वाद व पोषण कायम ठेवतात.

### ग्लोब एंटरप्राइझेस लिमिटेडचे तिमाहीचे निकाल जाहीर

मुंबई (स. गांवकरी) : वस्त्र, डेनिम आणि होम टेक्सटाइल क्षेत्रातील अग्रणी कंपनी ग्लोब एंटरप्राइझेस (इंडिया) लिमिटेडने वित्तीय वर्ष 2025-26 च्या दुसऱ्या तिमाहीचे मजबूत आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने सप्टेंबर 2025 समाप्त तिमाहीत ऑपरेशनल स्तरावर प्रभावी कामगिरी केली असून महसूल आणि निव्वळ नफ्यात लक्षणीय वाढ नोंदवली आहे. कंपनीने सप्टेंबर-2025 समाप्त दुसऱ्या तिमाहीत ₹15,856.26 लाखांची आवक नोंदवली. जून-2025 तिमाहीतील ₹14,844.87 लाखांच्या तुलनेत ही 6.81 टक्क्यांची वाढ ठरली. तिमाहीचा करानंतर नफा (PAT) सप्टेंबर-2025 मध्ये ₹446.38 लाख झाला. जून-2025 मधील ₹139.52 लाखांच्या तुलनेत हा तब्बल 219.94% वाढ दर्शवतो. उच्च मार्जिन्स आणि सुधारित ऑपरेशनल कार्यक्षमतेमुळे नफ्यात ही जोरदार वाढ झाल्याचे कंपनीने स्पष्ट केले. ग्लोब एंटरप्राइझेसचे एमडी भाविक परिख म्हणाले की, "तिमाही आणि अर्धवार्षिक कालावधीतील मजबूत आर्थिक आकडे कंपनीच्या कार्यक्षमतेवर आणि बाजारविस्तारावर केंद्रित धोरणाचे फलित आहेत. खर्चदबाव असतानाही आम्ही चांगली नफा क्षमता आणि स्थिर वाढ साध्य केली आहे. आगामी तिमाहीतही ही गती कायम राहील असा आम्हाला विश्वास आहे." संचालक मंडळाने कंपनीचे नाव ग्लोब टेक्सटाइल्स (इंडिया) लिमिटेड वरून ग्लोब एंटरप्राइझेस (इंडिया) लिमिटेड असे बदलण्यास मंजुरी दिली.कंपनीचे प्रवर्तक भाविक सूर्यकांत परिख यांनी 12 नोव्हेंबर 2025 रोजी ₹1,28,56,450 मूल्याचे 45,00,000 इक्विटी शेअर्स खरेदी केले.

# अनेक कामे मंजूर मात्र प्रशासक राज मुळे झाली नाहीत

## आता विकास आघाडीची सत्ता येताच रस्त्यांच्या कामाला प्राधान्य - डॉ. उषाताई तनपुरे

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

राहुरी नगरपालिकेच्या जनसेवा मंडळाच्या कार्यकाळात अनेक विकास कामे झाली मध्यंतरी प्रसासक राज मध्ये कामे मंजूर होऊन ती झाली नाहीत आता पालिकेवर विकास आघाडी च्या सर्व उमेदवारांना विजयी करून सत्ता द्यावी राहुरी शहर व परिसराचा सत्तेच्या माध्यमातून विकास केला जाईल अशी ग्वाही जिल्हा नियोजन समितीच्या माजी सदस्य माजी नगराध्यक्ष डॉ.सौ उषाताई तनपुरे यांनी दिली. राहुरी नगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक सहा मधील विकास आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार भाऊसाहेब मोरे व प्रभाग क्रमांक सहा मधील उमेदवार संजीव सुधाकर उदावंत आणि माधुरी अनिल माळी यांच्या प्रचाराचा नारळ डॉ. सौ तनपुरे यांच्या हस्ते फोडण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.



कासार गल्लीतील श्री गणेश मंदिरात उमेदवार नागरिक महिला यांच्या उपस्थितीत उत्साहात नारळ फोडण्यात आला. यावेळी डॉ. तनपुरे म्हणाल्या की मागील नगरपालिकेवरील सत्तेच्या काळात शहरात जॉगिंग ट्रॅकसह सर्व चौकांमध्ये सुशोभीकरण सेल्फी पॉईंट आधी शहराच्या वैभवात भर घालणारी कामे केली शहरात शहराच्या ३स्वागत प्रवेशद्वार बांधले असून या प्रवेशद्वारांवर श्री तुळजाभवानी माता, शहराची ग्रामदेवत हनुमान, तसेच राहू केतू यांची नावे असलेल्या प्रवेशद्वार करण्यात आल्या, रस्त्याचे प्रश्न पाण्याचे प्रश्न व अन्य विकास कामे केली मात्र प्रशासकीय राजवटीत प्रशासकाच्या कार्यकाळामध्ये अनेक मंजूर झालेली कामे करता आली नाही. शहरातील भूमिगत गटारीच्या कामामुळे सर्वत्र खड्डे पडले आणि नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागले मात्र त्या कामांचाही पाठपुरावा करण्यात आला.

नगरपालिकेवर विकास आघाडीची सत्ता येताच राहुरी शहर व परिसरातील सर्व रस्त्यांची कामे कामांना अग्रक्रम दिला जाईल अशी ग्वाही यावेळी डॉ. सौ तनपुरे यांनी दिली.

डॉ. जयंत कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त करताना उदावंत व माळी हे उमेदवार प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य, कार्यक्षम व सर्वसमावेशक असल्याचे सांगितले. तसेच, त्यांची निवड माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, डॉ. तनपुरे साखर कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे आणि विकास मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब 'चाचा' तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली असून सर्वांनी त्यांना सहकार्य करून विजयी करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्षा सौ. सोनाली उदावंत, तसेच डॉ. जयंत कुलकर्णी, राजेंद्र उदावंत, योगेश चुत्तर, प्रशांत कोळपकर, वैभव सुराणा, सचिन बोरुडे, विलास उदावंत, सुरज बिहानी, डॉ. संतोष उदावंत, विजयी धिमटे, संतोष मैड, सुनील रासने, अनिल भट्टड, योगेश मालपाणी, नितीन शहाणे, रवींद्र उदावंत, दादासाहेब भडकवाड, अक्षय कोळपकर, अमर कुंभकर्ण, पियुष कोळपकर, महावीर आवटी, विश्वास बुर्हाडे, मनोज रासने, पत्रकार वसंत झावरे, प्रसाद मैड, श्रेयस लोळगे , दीपक नागरे,रत्नाकर जोशी, श्रीनिवास सहदेव, महेश उदावंत, अरुण दळवी, तुषार दळवी, अमोल गायकवाड, सिताराम माळी, जावेद शेख, सलीम बागवान यांसह परदेशी परिवार, नहार परिवार, सुराणा परिवार व प्रभाग ६ मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेन्सोडाईनतर्फे विश्वसनीय प्रोनॅमलची भारतात सुरुवात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सेन्सोडाईन या आघाडीच्या मौखिक आरोग्याच्या हेलिऑन च्या ब्रॅन्ड तर्फे आज त्यांच्या प्रोनॅमल या उत्पादनाची भारतात सुरुवात करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली, ही जगभरांतील विश्वसनीय अशी टुथपेस्ट असून या उत्पादनाची निर्मिती ही दातांचे एनॅमल मजबूत करण्यासह त्यांची सुरक्षा करण्यासाठी करण्यात आली आहे. या नवीन सुरुवातीमुळे सेन्सोडाईन तर्फे त्यांची उत्पादन श्रेणी वाढवण्यासह एनॅमल वेअर सारख्या मौखिक आरोग्याच्या दुर्लक्षित अशा समस्येवरही उपाय आणला आहे.

आंबट फळे, पेये, लोणची, चहा आणि कॉफी यांसारख्या आम्लयुक्त पदार्थ आणि पेयांचे सेवन वाढत्या प्रमाणात केल्यामुळे दातांचे एनॅमल खराब होऊन त्याचा दातांना त्रास होऊ लागतो. एनॅमल खराब झाल्यामुळे भविष्यातील सेन्सेटिव्हिटी, दात पिवळे होणे, किडणे यासारख्या आजारपणांना सामोरे जावे लागते.

# "बिल्डिंग बेटर किचन" कार्यक्रमात रत्नानी आणि आचार्य यांची उपस्थिती

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नॅशनल रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया (एनआरएआय) पुणे चॅप्टरने त्यांच्या प्रमुख कार्यक्रम "बिल्डिंग बेटर किचन" चे यशस्वी आयोजन फर्ग्युसन कॉलेज रोडवरील सोशल येथे मंगळवारी, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी केले. पुणे गॅसच्या सहकार्याने आणि ॲलिस्टर इक्विपमेंटच्या सहयोगाने, या कार्यक्रमात १६० हून अधिक शेफ, रेस्टॉरंट मालक, सेवा पुरवठादार आणि एफ अँड बी क्षेत्रातील प्रमुख सहभागी झाले. कार्यक्रमात व्यावसायिक किचन डिझाईन आणि ऑपरेशन्समध्ये सुधारणा या विषयावर सखोल चर्चा झाली. निवडक टेक ब्रँड्सने तंत्रज्ञानाच्या मदतीने ऑपरेशन, व्यवस्थापन आणि रेस्टॉरंट्सच्या कामगिरीत सुधारणा करणारे उपाय सादर केले.




या कार्यक्रमात सेलेब्रिटी शेफ विकी रत्नानी यांनी त्यांच्या व्यावहारिक अनुभव, कुकिंगमधील सर्जनशीलता आणि पुढारलेल्या दृष्टिकोनाद्वारे उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्यासोबत उत्कृष्ट किचन सल्लागार श्री. सदानंद आचार्य यांनी किचन नियोजन व कार्यक्षमता वाढवण्याबाबत उपयुक्त माहिती दिली. दोन्ही वक्त्यांनी भारताच्या झपाट्याने वाढणाऱ्या फूड सर्विस इंडस्ट्रीच्या बदलत्या गरजा, आधुनिक किचन डिझाईन, वर्कफ्लो ऑप्टिमायझेशन, ऊर्जा कार्यक्षमता, सुरक्षेतील नाविन्य आणि शाश्वततेचे तत्त्व यावर प्रकाश टाकला. सहभागी उपस्थितांना भविष्यातील तंत्रज्ञान आणि ट्रेंडप्रमाणे किचन कसे गतिमान, अनुपालनक्षम व टिकाऊ बनवता येतील याबाबत महत्त्व ठेवणाऱ्या गोष्टी मिळाल्या. कार्यक्रमात शेफ विकी रत्नानी म्हणाले, "पुणे चॅप्टर खरोखरच विलक्षण आहे — सदस्य आणि गैरसदस्यांनी दाखवलेली ऊर्जा आणि समर्पण प्रेरणादायक आहे. 'भविष्यातील उत्कृष्ट किचन' सत्राला मिळालेला प्रतिसाद आश्चर्यकारक होता. संपूर्ण व्यवस्थापन, आसनव्यवस्था, तांत्रिक व्यवस्था आणि पाहुणचार देखील उत्कृष्ट होता.

# जेन एस लाइफ घेऊन येत आहे ऊर्जा आणि मौज

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

भारताचा ज्येष्ठ मंडळींसाठीचा (55+) आघाडीचा लाइफस्टाइल आणि कम्युनिटी प्लॅटफॉर्म जेन एस लाइफ ने ज्येष्ठांना अधिक सक्रिय, आनंदी आणि एकमेकांशी जोडलेले जीवन जगण्यास मदत करण्याचे आपले मिशन चालू ठेवले आहे. त्यासाठी आता सकाळी 8 वाजता, दुपारी 4 वाजता आणि रात्री 10.30 वाजता दररोज ऑनलाइन इव्हेंटची एक मालिका सुरू केली आहे. योग आणि संगीतापासून ते डान्स, पुस्तक वाचन, आध्यात्मिकता आणि वीकएंडच्या भेटीगाठींपर्यंत ही सत्रे अशा प्रकारे डिझाईन करण्यात आली आहेत की या ज्येष्ठ मंडळींचे डोके तल्लख राहावे, शरीर सक्रिय राहावे आणि मनाने ते इतरांशी जोडलेले रहावेत.

परस्परसंवादी उपक्रम ज्येष्ठांना मनापासून आवडतात हे जाणून जेन एस लाइफ ने एक साप्ताहिक लाईव्ह ऑनलाइन कॅलेंडर बनवले आहे, जे दररोज या मंडळींना व्हर्च्युअली एकत्र आणते.

लाईव्ह इव्हेंट्सना मिळालेला जबरदस्त प्रतिसाद पाहून, उपभोक्त्यांच्या प्रतिक्रिया ध्यानात घेऊन हा प्लॅटफॉर्म आपल्या कॅलेंडरमध्ये आणखी काही गोष्टी जोडत आहे,

जशा की गायला शिकणे, स्टँड अप कॉमेडी, तंबोला, गुजराती, मराठी, तमिळ आणि इतर काही भाषांमध्ये कराओके वगैरे.

जेन एस लाइफ च्या संस्थापिका मीनाक्षी मेनन म्हणाल्या, " जेन एस लाइफ मध्ये आम्ही मानतो की, एकमेकांशी असलेले संबंध हेच सुखी आणि निरोगी जीवनाचे गमक आहे. आमच्या दैनिक लाईव्ह ऑनलाइन इव्हेंट्सने एक सुंदर समुदाय उभा केला आहे, जेथे ज्येष्ठ मंडळी दररोज एकत्र येतात आणि डान्स करतात, हसतात, शिकतात आणि शेअर करतात. ही सत्रे त्यांच्या दिनचर्येचा भाग झाल्याचे पाहून फार बरे वाटते. त्यांना पाहताना वाटते की खरोखर आनंदाला वय नसते."

# एफआयएच पुरुष हॉकी ज्युनियर वर्ल्ड कप ट्रॉफीचे भव्य स्वागत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

हॉकी इंडियाच्या वतीने आयोजित एफआयएच पुरुष हॉकी ज्युनियर वर्ल्ड कप ट्रॉफी टूर २०२५ चा भव्य सोहळा पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे.



या ट्रॉफीचे आगमन आज पुण्यात झाले असून याचे स्वागत हॉकी इंडियाचे असोसिएट उपाध्यक्ष मनोज भोरे आणि हॉकी महाराष्ट्राचे सरचिटणीस मनीष आनंद यांच्याकडून केले गेले.

दुसऱ्या दिवशी, २२ नोव्हेंबर रोजी शहरात 'ट्रॉफी टूर' साठी रवाना होईल तत्पूर्वी माननीय श्री. मुरलीधर मोहोळ, नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते औपचारिक स्वागत होणार आहे.

# ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने सादर केले भारत के सुपर फाउंडर्स

## सुनील शेट्टी यांच्या नेतृत्वातील भारताची नवी दमदार उद्योजकीय रिॲलिटी सीरिज, ₹100 कोटींच्या ऐतिहासिक गुंतवणूक वचनबद्धतेसह

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ॲमेझॉन एमएक्स प्लेअर या ॲमेझॉनच्या विनामूल्य व्हिडिओ स्ट्रीमिंग सर्व्हिसतर्फे भारत के सुपर फाउंडर्स या भारताच्या स्टार्टअप मनोरंजन क्षेत्रात महत्त्वाचा टप्पा ठरणाऱ्या हाय-स्टेक्स असलेल्या उद्योजकीय रिॲलिटी सीरिजचे अनावरण करण्यात आले आहे. ही सीरिज भारतातील स्टार्टअप एंटरटेनमेंट क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा आहे. सुनील शेट्टी या शोचे सूत्रसंचालक व मार्गदर्शक असून या शोच्या निमित्ताने देशातील काही उदयोन्मुख फाउंडर्स एकत्र येणार आहेत आणि प्रख्यात बिझनेस टायकून्ससमोर ते आपल्या कल्पना मांडतील. या बिझनेस टायकून्सनी रिकर क्लबसोबत संयुक्तपणे भारताच्या स्टार्टअपच्या स्वप्नाला निधी पुरविण्यासाठी ₹100 कोटींची तरतूद केली आहे. यामुळे, भारतीय मनोरंजन प्लॅटफॉर्मवर दाखवण्यात आलेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी एकत्रित गुंतवणुकीची रक्कम ठरते. अस्सलपणा, पारदर्शकता आणि उद्योजकतेच्या प्रवासाबद्दल असलेला आत्यंतिक आदर असलेल्या या फॉरमॅटमध्ये भारत के सुपर फाउंडर्समध्ये प्रत्येक बिझनेस पिच हे व्हेरिफाय केलेली माहिती, विश्वसनीय डेटा आणि बिझनेस चालविण्यासाठी आवश्यक असलेली खरी, मूलभूत तत्वे यांचा आधार असेल याची खातरजमा करण्यात येते. या शोमध्ये करण्यात येणारे करार खऱ्या गुंतवणुकीच्या उद्देशावर आधारित आहेत. त्यामुळे निर्णयप्रक्रिया स्पष्ट, पारदर्शक व जबाबदारीपूर्ण असते. या वैशिष्ट्यांमुळेच भारत के सुपर फाउंडर्स हा शो इतर कोणत्याही उद्योजकीय रिॲलिटी शोपेक्षा अनोखा ठरतो. या शोच्या नावाप्रमाणेच यात वैविध्य, आव्हानांवर मात करून पुन्हा भरारी घेण्याची क्षमता आणि देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यातील उद्योजकाची महत्त्वाकांक्षा यांचे कौशल्य साजरे करण्यात आले आहे आणि या ठिकाणी सुपरफाउंडर्स सर्वात महत्त्वाचे असतात. ज्या व्यक्तींच्या कल्पना, धारणा आणि चिकाटीमध्ये अर्थपूर्ण बदल घडविण्याची क्षमता आहे, अशा व्यक्तींची दखल घेण्यात येते. या ध्येयाला बळ देणारी देशातील काही सर्वात प्रभावशाली उद्योगपतींची बलाढ्य टीमही शोमध्ये सहभागी आहे. यात डॉ. ए. वेलुमणी (क्रिएटर, थायरोकेर), नितीश मिटरसेन (जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ, नझारा टेक्नॉलॉजीज), डॉ. आरती गुप्ता (मॅनेजिंग पार्टनर, ॲनिकार्थ व्हेंचर्स), शांती मोहन (संस्थापक आणि सीईओ, एलव्हीएक्स), आदित्य सिंह (सह-संस्थापक, ऑल इन कॅपिटल) आणि अंकुर मित्तल (सह-संस्थापक / पार्टनर, फिसिस कॅपिटल आणि इंफ्लेक्शन पॉईंट व्हेंचर्स) यांचा समावेश आहे. संपूर्ण सीझनमध्ये या सोबत वेगवेगळे नामांकित बिझनेस लीडर्स पॅनेलमध्ये सहभागी होतात. त्यांच्या उपस्थितीमुळे गुंतवणुकीकडे विविध दृष्टीकोनातून पाहण्याची, वेगवेगळ्या क्षेत्रांची सखोल समज आणि वेगवेगळ्या गुंतवणूक तत्त्वज्ञानांची भर पडते.

